बुधवार, २७ सप्टेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ५६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 27 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-55 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

## पंतप्रधान मोदींचे वक्तव्य क्लेशदायक

### शरद पवार : राज्य महिला आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महिला आरक्षणाच्या विधेयकाला दोन सदस्य सोडले तर कोणीही विरोध केला नाही. एकमताने हे विधेयक मंजूर करण्यात आले. मात्र, महिला आरक्षण विधेयकाला विरोधकांनी नाईलाजाने पाठिंबा दिला ही पंतप्रधान नरेंद्र मोदींची टीका चुकीची आहे. महिला आरक्षणावर आधी देखील विचार झालेला आहे. पंतप्रधानांनाचे ते वक्तव्य क्लेषदायक आहे. असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांनी आयोजित पत्रकार परिषदेत म्हटले आहे.**

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, देशाच्या पंतप्रधानानी एका ठिकाणी भाषण करीत असताना संसदेमध्ये महिलांच्या आरक्षणासंदर्भात जो निर्णय एकमताने घेतला त्याला काँग्रेससह काही पक्षांनी इच्छा नसताना सहमती दर्शवली असे म्हटले होते. ते त्यांचे वक्तव्य क्लेषदायक वाटल्याच्या भावना पवार यांनी यावेळी बोलून दाखविल्या. तर त्या निर्णयासंबंधी कुणीही विरोध केला नव्हता फक्त सूचना काही सहकाऱ्यांच्या होत्या की, एवढा व्यापक निर्णय घेताय तर तेव्हा एससी, एसटीसोबत, ओबीसींनाही संधी मिळावी अशी मागणी होती. ही पार्श्वभूमी असताना पंतप्रधानानी केलेले वक्तव्य क्लेषदायक वाटत असल्याचेही पवार यांनी सांगितले आहे.शरद पवार यावर सविस्तर बोलताना म्हणाले की, काँग्रेस आणि इतरांनी नाइलजाने आरक्षणाच्या विधेयकाला सहमत दर्शवली आहे, असे म्हणत पंतप्रधान यांनी इतक्या वर्षांत कुणीही काहीही केले नाही असे म्हटले होते. मात्र तसे नसून देशांमध्ये 1993 मध्ये राज्य महिला आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते. मी मुख्यमंत्री असताना जून 1993 साली महिला आयोग स्थापन करून महिलांसाठी स्वतंत्र विभाग सुरू केला. अशीही माहिती त्यांनी यावेळी देत पंतप्रधानानांच्या त्या वक्तव्याचा समाचार घेतला.


पवार पुढे म्हणाले की, महिलांना आरक्षण देण्याचे काम देखील आम्ही केले. देशात पहिले महिला धोरण जाहीर झाले त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 33 टक्के आरक्षण दिले हे आरक्षण देणारे महाराष्ट्र पाहिले राज्य होते. मी संरक्षण विभागात असताना तिन्ही दलात महिलांसाठी 11 टक्के जागा राखीव ठेवल्या असेही पवार यांनी स्पष्ट केले आहे. शरद पवार साहेब पुढे म्हणाले की, महिलांसाठी कुणीच काहीही केले, नाही तसा विचारसुद्धा कुणी केला नाही असे मोदींनी म्हटले होते पण तसे नाही जेव्हा माझ्याकडे देशाचे संरक्षण खाते होते तेव्हा 22 जून 1994 ला देशात पहिले महिला धोरण जाहीर केले होते. यामध्ये सरकारी, निमसरकारी महिलांसाठी सोयी-सुविधा कशा पुरवल्या जातील याचा विचार केल्या गेला. तर संरक्षण खाते होत तेव्हा तिन्ही दलात महिलांसाठी 11 टक्के आरक्षण महिलांना जाहीर केले होते. यासोबतच दिल्ली येथील प्रजाकसत्ताक दिनाच्या परेडचे नेतृत्व एक भगिनी करते हे आपण पाहतो. एअर फोर्समध्ये महिलांना सहभागी करून घेण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला होता. तर संरक्षण मंत्री असताना प्रत्येक बैठकीत मी महिलांना या तीनही दलात घ्या, असे मी म्हणत होतो पण मान्य करीत नव्हे पंरतू मी हा निर्णय घेतला आणि चर्चाच बंद करून टाकली अशीही माहिती पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार यांनी यावेळी दिली.

### महत्त्वाची बातमी

## वहिदा रहमान यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** आयबी मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली



माहिती ज्येष्ठ अभिनेत्री वहिदा रहमान यांना यंदाच्या दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती, माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी मंगळवारी दिली आहे. हा पुरस्कार मिळवणाऱ्या वाहिदा राहमन या ८ व्या महिला अभिनेत्री ठरल्या आहेत. वहीदा रहमान यांचा जन्म तामिळनाडूतील चेंगलपेट या गावात 3 फेब्रुवारी १९३८ रोजी झाला. हे गाव आता मद्रास शहराचे उपनगर आहे. त्यांनी आपली कारकीर्द तमीळ व तेलुगू चित्रपटांपासून सुरू केली होती. पण त्या त्यांच्या हिंदी चित्रपटांतील अभिनयामुळे लोकप्रिय झाल्या. वहिदांनी त्यांच्या करिअरमध्ये घुँघर, चाँदनी, चौदहवी का चाँद, जस्टिस,ज़िदगी ज़िंदगी, ज्वालामुखी ,ज्योती बने ज्वाला, 12 ओ क्लॉक, तीसरी क़सम, त्रिशूल, त्रिसंध्या, दर्पण, दिल दिया दर्द लिया, दिल का राजा, दिल्ली 6, धरती, धरम काँटा, नमक हलाल, नमकीन,नीलकमल, पथ्थर के सनम, पालकी,प्यासा, गाइड, रेश्मा और शेरा आणि रंग दे बसंती यांसारख्या ९० हून अधिक हिट चित्रपटांमध्ये काम केले आहे.

## यशवंत सेनेचे उपोषण मागे

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** धनगर आरक्षणासाठी चौंडी येथे सुरू असलेले उपोषण 21 व्या दिवशी मागे घेण्यात आले आहे. राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांची शिष्टाई यशस्वी ठरली. अहमदनगरमधील चौंडी येथे यशवंत सेनेच्यावतीने उपोषण सुरू होते. धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीतील आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी आंदोलन सुरू आहे. धनगर समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे. त्या मागणीसाठी मागील 20 दिवसांपासून अहमदनगर येथील चौंडीमध्ये उपोषण आंदोलन सुरू आहे. आज 21 व्या दिवशी उपोषणकर्ते सुरेश बंडगर आणि अण्णासाहेब रुपनवर या दोघांचीही प्रकृती बिघडली. काल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलकांशी फोनवरुन चर्चा करत त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली आहे. दरम्यान आज मंत्री गिरीश महाजन हे चौंडीत उपोषणकर्त्यांशी चर्चा करण्यासाठी आले होते. त्यानंतर आज उपोषणकर्त्यांसोबत गिरीश महाजन यांनी चर्चा केली. त्यांनी सरकारची भूमिका समजावून सांगितली. आंदोलकांचे समाधान झाल्याने अखेर उपोषण मागे घेण्यात आले. 21 सप्टेंबर रोजी धनगर आरक्षणसंदर्भात सरकार आणि यशवंत सेनेच्या शिष्टमंडळाशी चर्चा झाली. त्यावेळी सरकारकडून सकारात्मक चर्चा झाली. सरकार गंभीर असल्याचे सांगण्यात आले होते.

## मराठवाडा मुक्तिसंग्रामाची थरारक गाथा मंचावर साकार

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ अशा असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या नेतृत्वात मराठवाड्यातील जनतेने लढलेल्या थरारक मुक्तिसंग्रामाची गाथा 25 सप्टेंबर रोजी जालना येथे जेईएस महाविद्यालयाच्या मंचावर साकार झाली.

मराठवाडा मुक्तीलढ्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्य शासनाच्या संस्कृतिक संचालनालयाच्या वतीने मराठवाड्याच्या 8 जिल्ह्यांतील सर्व 76 तालुक्यांमध्ये डॉ. सतीश साळुंके व ॲड. शैलेश गोजमगुंडे लिखित 'गाथा मुक्तिसंग्रामाची' या नाटकाचे प्रयोग सध्या होत आहेत.

भारत स्वतंत्र झाला तरी हैदराबादच्या निजामाने मराठवाड्यातील जनतेवर जुलमाने सत्ता चालवून भारतात विलीन होण्यास नकार दिला. त्यावर पेटून उठलेल्या सर्व जातिधर्मांच्या लोकांनी निजामाशी केलेला संघर्ष आणि स्वातंत्र्यवीरांनी केलेल्या बलिदानाची ही प्रेरणादायी गाथा सम्राट नाट्यसंस्था व सांस्कृतिक मंडळ धाराशिव या संस्थेच्या कलावंतांनी अतिशय उत्कट अभिनयातून सादर



केली. निजामकाळ दर्शवणारे नेपथ्य, शाहिरी बाजाचे संगीत व प्रभावी प्रकाशयोजनेतून नाट्यपरिणाम अधिक गडद होतो. या नाटकाचे दिग्दर्शन डॉ. सुधीर निकम यांचे आहे. व्यवस्थापन व नेपथ्य रामेश्वर झिंजुर्डे, संगीत हरीओम जैस्वाल, प्रकाशयोजना मुकेश ढवळे, रंगभूषा निकिता डोख, वेशभूषा आकाश अरगडे यांची आहे. यात अशोक चने, सुमित डोंगरदिवे, अभिलेख कुढेकर, सौरभ वाघ, रोहित सोनारकर, अविनाश राठोड, नामदेव जाधवर, अंजली वाहुळ, मृण्मयी देशमुख, प्राजक्ता कळमकर, दत्तात्रेय काकडे, ऋषिकेश आव्हाड, यश पाटील, अभिषेक उंबरकर, विशाल सरोदे, दुर्गेश सरनाईक, आदिनाथ कुबेर, शुभम चव्हाण यांनी विविध भूमिका साकारल्या आहेत.


## देवगिरी किल्ल्यावरील प्राचीन संकटमोचक गणेश मूर्ती


### यादवकाळापासून किल्ल्यावरील गणेशाची पूजाअर्चा

आधुनिक केसरी न्यूज

प्रकाश लकडे


दौलताबाद : देवगिरी येथील यादवकालीन देवगिरी किल्ल्यातील श्रीगणेश मंदिरात दरवर्षी गणेश मूर्तीची पूजा अर्चा आणि आरती करण्यासाठी दौलताबाद (देवगिरी) गावातील तरूण भाविक भक्तांबरोबरच वृध्द आजही गणेश उत्सव साजरा करण्यासाठी हजर असतात. पारंपारिकता जपत येथील गावकरी मोठ्या आनंदाने गृणेश उत्सव साजरा करतात. या गावातील तरुणमंडळींबरोबर वृद्धही या काळात आवर्जून किल्ला चढतात नि गणपती बाप्पाला आपल्या अडीअडचणी व जीवनकाळात येणाऱ्या समस्यांचा निपटारा करण्यासाठी संकटमोचक म्हणून आर्जव करतात. आधीच्या काळात आरतीच्या समयी चौघडा वाजवण्याची पद्धत होती. त्याचबरोबर तोफांचा आवाज करुन इशारा वजा शहाडा





संत जनार्दन स्वामी हे चाळीसगावचे देशपांडे . निजामशाहीच्या काळातील दौलताबादचे किल्लेदार तसेच एक महान संत म्हणून विख्यात आहेत . त्यांचे अनेक अभंग आहेत . यामुळे श्री दत्ताने जनार्दन स्वामींना प्रत्यक्ष दर्शन दिले . ज्या स्थळी दत्त प्रकट झाले तेथे दत्ताच्या पादुका आहेत . दत्तपादुका शेजारी जनार्दन स्वामींच्या चरण पादुका आहेत . मार्गशीर्ष वैद्य एकादशी ला येथे मुख्य यात्रा असते . पैठणचे महान संत श्री एकनाथ महाराज यांचे हे गुरु . एकनाथ महाराज येथे गुरूंच्या सहवासात सहा वर्ष होते .

देण्यात येत असे. राजा भिल्लम यादवच्या कालखंडात हेमाद्रीपंत नावाचे ब्राम्हण व्यक्ती यादवांचा धार्मिक विचाराचे सल्लागार होते. त्यांच्यापासून येथील गणपती बाप्पांचे पूजन अर्चन होण्यास सूरुवात झालेली होती, असे ऐतिहासिक दस्तांमधून आढळून येते. कारण याच काळात यादवांच्या राज्यात व्रत, वैकल्य, होमहवन, पूजाअर्चा कर्मकांडास सूरुवात झालेली होती. म्हणून या गावात आजही महादेवाची बरीचशी मंदिरे अस्तित्वात आहेत. खिलजी व तूघलक राजांच्या काळात या मंदिरांतील मूर्ती सूरक्षित राहावी, म्हणून सदर मंदिरे तळघरात असायची तिथेच मंदिराच्या आत नंदी व श्रीगणेश यांचीही स्थापना केलेली होती. येथील पाताळेश्वर मंदिर त्याची आजही साक्ष देते.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

देशातील पन्नास टक्के लोकांकडे देशातील संपत्तीच्या फक्त १३% संपत्ती आहे. तर आश्चर्य म्हणजे फक्त एक टक्का लोकांच्या हातात देशातील २२%संपत्ती एकवटली आहे. हे आकडे पुरेसे बोलके आहेत.
इंटरनेट, मोबाईल मुळे जवळची माणसे दूर गेली आहेत. लांबची माणसे ' आभासी ' पद्धतीने जवळ आली आहेत. घरात असणाऱ्या चार माणसांची तोंड त्यामुळे चार दिशांना झाली आहेत. माणसामाणसातील अंतर वाढते आहे. लोकांमध्ये सामाजिक अंतर पडलं आहे, आर्थिक अंतर पडलं आहे. जातीजातीत, मनामनात माणूस विभागला गेला आहे. समाजाची एकसंध असणारी वीण उसवत चालली आहे. ती जास्त उसवण्याआधी त्यासाठी काहीतरी करण्याची जबाबदारी तुम्हा आम्हा सगळ्यांची आहे. अन्यथा पुढच्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत. असं म्हणतात की श्रीकृष्णाला मिळालेल्या शापामुळे त्याचे यदुकुळातील वंशज आपसातच लढून संपले. आपल्यावरही आपसात लढून असे संपण्याची वेळ तर येणार नाही ना अशी भीती आजच्या या वातावरणामुळे निर्माण झाली आहे. त्यासाठी मने सांधणे गरजेचे आहे. एकमेकांना समजून घेणे महत्वाचे आहे. या समाज व्यवस्थेतील प्रत्येकच घटक महत्वाचा आहे. हे त्याचे महत्व जेव्हा आम्ही समजून घेऊ, तेव्हाच या समाजाला एकसंध करण्याच्या दिशेने आपले पहिले पाऊल पडेल. नाहीतर आमच्यातील अंतर वाढतच जाईल. त्यासाठी हे अंतर जोडणारा मनामनांचा सेतू आम्हाला उभारावा लागेल. इंग्रजीत त्यासाठी एक छान वाक्प्रचार आहे ' ब्रीज द गॅप. ' अंतर कमी होण्यासाठी ' अंतरात ' डोकावून पाहावं लागेल. त्यासाठी हे मानवा ' अंतरातील ज्ञानदिवा मालवू नको रे... ' एवढेच सांगावेसे वाटते.



## आनंदी पहाट

## स्वतःसाठी चांगले वाईट पाहणे गरजेचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अनेकांना गुगलवर एखादा पत्ता शोधताना मनस्ताप झाल्याचे अनुभवायला येत असते, समाज माध्यमांव्दारे केल्या जाणाऱ्या खोट्यानाट्या जाहिरातींना भुलून आजवर अनेकांची आर्थिक, मानसिक,

शारीरिकदृष्ट्या फसवणूक होत आहे. काही व्यावसायिक वेबसाईटच्या माध्यमातून खोटे आर्थिक व्यवहार करून, बँक खात्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे ती खातेदाराकडून लबाडीने मिळवून नकळत आर्थिक फसवणूक केली जात असल्याचेही आपण ऐकत आहोत. अर्थात, ह्या अभासी दुनियेत सहभागी व्हायला काहीच हरकत नाही, परंतू प्रथमतः त्याची सविस्तर माहिती करून घेऊन, सखोल अभ्यास करून आणि योग्य दक्षता बाळगून मगच सावधपणे विचार, वर्तन आणि व्यवहार करणे हिताचे ठरते. अलीकडच्या काही काळापासून अनेकांना आभासी दुनियेचे प्रचंड आकर्षण वाटू लागले आहे. समाज माध्यमांच्याइतका विश्वास इतरांवर तर लांबच परंतू स्वतःवर देखील ठेवला जात नाही. अनेकदा सोशल

मिडीयाच्या माध्यमातून झालेला त्रास, मनस्ताप, दुःख, नुकसान, फसवणूक आणि कालांतराने पश्चाताप भोगण्याची वेळ अनेकांवर येत असल्याचे आपण सर्वच ऐकत आहोत. सोशल मिडीयाच्या आहारी जाण्यामुळे आणि फसगत झाल्यामुळे सोशल मिडिया आपल्याला सोसत नाही, हे अभ्यासपूर्वक समजून घेण्याची गरज असते. गुगल काहीवेळा गुगली टाकत असते, हे लक्षातच घेतले जात नाही. सोशल मिडिया, गुगल, विविध वेबसाईट अनेकदा आपल्याला अत्यंत योग्य, चांगली, गरजेची, आवश्यक माहिती पुरवतात, परंतू नेहमीच तसे घडेल असेही नाही. अनेकदा आभासी दुनियेत मशगुल झालेल्यांना स्वतःचे चांगले-वाईट कळत नाही. आपल्या अभ्यासाच्या अभावामुळे आणि आभासी दुनियेच्या आकर्षणामुळे भविष्यात आपल्यावरच पश्चात्तापाची वेळ येऊ शकते.



आधुनिक केसरी

### अद्वैत स्वामी तू | या दासाचा ||

तू करूणेश्वर | तू जगदीश्वर ||
तू प्राणेश्वर | श्रीरंगा रे ||१||
तू मुरलीधर | तू कृपासागर ||
सखा निरंतर | दीनदयाळा ||२||
अनादीकालचा | आदी-अंतही तू ||
त्रिकाल सत्य तू | सर्वेश्वरा ||३||
राधेश्याम तू | मेघःशाम तू ||
आत्माराम तू | या विश्वाचा ||४||
श्वास माझा तू रे | विश्वास एक तू ||
अद्वैत स्वामी तू | या दासाचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

कौशलं देहि मह्यं च नैपुण्यं विजयं यशः |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् ||
९६ || मला कौशल्य दे, नैपुण्य दे, विजय दे,
यश दे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी
मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सन्त ज्योति अज अत्त्रिय, ज्ञानी सुकृत
देव । हिरण्यगर्भ कह ताहि को, ऋषि
मुनि जाको सेव ।।४८।।(स्वर्वेद चतुर्थ
मण्डल प्रथम अध्याय) ०४/०१/४८
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
त्या आदि गुरूंनाच संत, ज्योती, अज,
अत्रि, ज्ञानी, सुकृत आणि हिरण्यगर्भ
म्हणतात. मंत्रद्रष्टा ऋषी तसेच मुनिजन
आपल्या कल्याणासाठी त्यांचीच भक्ती
करतात.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## साईबाबा

आधुनिक केसरी




भक्तिसारामृतकार दासगणू महाराज आणि महाराजांचे अनुभव तसेच साईसच्चरिताचा उपोद्धात लिहणारे काकासाहेब दीक्षित यांच्या कल्पनेतून श्री साईबाबा हे पाथरीच्या ब्राम्हण कुटुंबात जन्मले आहेत असा समज पसरवून देणारे लिखाण सुरू झाले. त्यास पुढील काळात अनेकांनी उचलून धरले. परंतु, १९२५ आधी श्री साईबाबांचे जन्मस्थान पाथरी असावे याबाबत कुठे पुसटसाहि उल्लेख आढळत नाही. जून २०१४ मध्ये द्वारका आणि ज्योतिष पीठाचे शंकराचार्य असलेले जगद्गुरू स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांनी श्री साईबाबांच्या पूजेला आपला विरोध दर्शवला.[६] या विधानाने प्रेरित होऊन साईबाबा हे चांदमिया असून त्यांची पूजा करू नये अशी निरालस आणि तथ्यहीन वक्तव्य करून श्री साईबाबांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. श्री साईबाबा हे नानासाहेब पेशवे आहेत अशा आशयाचे लिखाणही श्री साईबाबांच्या बाबतीत झाले. परंतु साईभक्त हा मुळातच सकलमताचा आदर करणारा असल्याने अशा अनेक अफवा पचवून तो साईबाबांच्या भक्तीपथावर श्रद्धा आणि सबुरीचा संदेश पुढे नेत मार्गक्रमण करत आहे. श्री साईबाबांची नोंद तत्कालीन सरकारी कागदपत्रात अवलिया अशी सापडते. त्याहून महत्वाची गोष्ट अशी की त्याकाळी गुप्तहेर खाते आणि अधिकाऱ्यांनी श्री साईबाबांचे मूळ अज्ञात असल्याचे साईकालीन रिपोर्ट आणि ऑर्डरमध्ये स्पष्ट केले आहे. " जन्म बाबांचा कोण्या देशी । अथवा कोण्या पवित्र वंशी । कोण्या मातापितरांच्या कुशी । हे कोणासी ठावे ना ।। " या श्री साईसच्चरितातील अध्याय ४ मधील ११३व्या ओवीत[७] उल्लेख केल्या प्रमाणे बाबांच्या जन्माबाबत कुठेही कोणतीच खात्रीलायक माहिती सापडत नाही.
श्री साईबाबांच्या काळात तत्कालीन ब्रिटीश सरकारने सर्वप्रथम आपल्या अहमदनगर कलेक्टरेट सर्व्हेमध्ये तसेच विकली रिपोर्टस ऑफ क्रिमिनल इंटेलिजन्स ऑन पॉलिटीकल सिचूएशन या महत्वपूर्ण दस्तऐवजांमध्ये श्री साईबाबांची नोंद केलेली आहे. श्री साईबाबांना तत्कालीन लोक आपापल्यापरीने साधू, अवतार, फकीर तसेच अवलिया मानत असे महत्वपूर्ण निरीक्षण या दस्तऐवजात पाहण्यास मिळते.[८] क्रांतिकारक श्री. गणेश श्रीकृष्ण खापर्डे, सन्मानीय श्री. हरी सीताराम दीक्षित, पूर्वी खान्देशात असलेले भाटे नावाचे एक मामलतदार, श्री. चांदोरकर ( त्याकाळचे उपजिल्हाधिकारी आणि कोपरगावचे माजी मामलतदार) ई. अशा उच्चशिक्षित साईबाबांच्या भक्तांची नोंद या दस्तऐवजांमध्ये केलेली आढळून येते. तसेच बाबांनी कोणत्याही उपासनापद्धतीचा अवलंब केला नसल्याचेही यात नमूद केले आहे.

## नामाशिवाय कशानेही समाधान नाही

आधुनिक केसरी

मनुष्य चूक करतो, आणि 'देवा, क्षमा कर' म्हणतो; पण पुन्हा पुन्हा चुका करीतच रहातो. हे काही योग्य नव्हे. अशाने काही त्याला देव क्षमा करणार नाही. 'देवा, क्षमा कर' हे म्हणणे इतके सहज होऊन बसले आहे, की त्याचा अर्थच आपल्या ध्यानात येत नाही. तो जर ध्यानात येत असता तर मनुष्य त्या चुका पुन्हा पुन्हा न करता. अशा रीतीने आपण आपल्या बुद्धीच्या बळावर परमेश्वराला फसवू शकणार नाही. बुद्धीच्या जोरावर जर आपण माणसालाही फसवू शकत नाही तर परमेश्वर कसा फसेल ? आपण आपल्या बुद्धीच्या जोरावर परमेश्वराची प्राप्ती करून घेऊ, असे म्हणणे कदापीही योग्य होणार नाही. तेव्हा शरणागतीशिवाय मार्ग नाही. ते तुम्ही करा. समाधान काही परिस्थितीवर अवलंबून नाही. कितीही पुराणे वाचली, ग्रंथ मुखोद्गत केले, प्रवचने ऐकली, तरी मनाला समाधान लाभणार नाही. त्याप्रमाणे थोडे तरी आचरण केले पाहिजे. नामात राहिले पाहिजे. नामाशिवाय इतर कोणत्याही



गोष्टीने पूर्तता येऊ शकत नाही. नामाशिवाय खरे समाधान मिळणार नाही. तेव्हा तुम्ही भगवंताला अनन्यभावाने शरण जाऊन, त्याचे नाम आवडीने आणि सतत घ्या. एक गरीब वारकरी पंढरपूरला चालला होता. मोठ्या कष्टाने तो पायी चालला होता. वाटेत एक रेल्वेचे फाटक लागले, ते बंद होते म्हणून तो थांबला. इतक्यात तिथे एक मोटार येऊन उभी राहिली. आत एक मोठा श्रीमंत माणूस बसला होता. तोही पंढरपूरला चालला होता. वारकऱ्याच्या मनात आले, 'देवा, तुझी एवढी निस्सीम भक्ती मी करतो, परंतु माझी ही दशा; आणि हा लबाड व्यापारी, याला मात्र तू ऐश्वर्य देऊन आरामात पंढरपूरची यात्रा घडवतोस. काय तुझा हा न्याय !' एवढ्यात मोटारीचे दार उघडून दोन नोकरांनी त्या माणसाचे हात आपल्या खांद्यावर घेऊन त्याला खाली उतरविले. तो पांगळा होता ! वारकऱ्याने विचार केला, पांगळा होऊन आरामात पंढरपूरला जाण्यापेक्षा गरिबीत पायी जाणे बरे. आपल्याजवळ जे नाही ते ज्याच्यापाशी आहे तो सुखी असला पाहिजे, हे आपण धरून चालतो, पण तसा तो नसतो. त्याचे दुःख आपल्याला माहीत नसते. आणि तो स्वतःला जर सुखी समजत असेल, तर तो दारूच्या मदाप्रमाणे मद समजावा. आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान मानणे हाच विषयाची पकड ढिली करायचा उपाय आहे. आपली परिस्थिती ही परमात्म्याच्या इच्छेने आली आहे असे आपण म्हणू या. असे जर आपण केले तर दुःखाचा आवेग कमी होईल.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २७ सप्टेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



# पत्रकारांनी बदल स्वीकारावेत : दिप्ती राऊत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सोशल मीडियामुळे पत्रकारितेत अमूलाग्र बदल झालेले आहेत. बातमीचा ताजेपणाला मर्यादा आली आहे, पूर्वी आजची बातमी उद्या शिळी होत होती, आता ती काही वेळातच शिळी होत आहे. बातमी मागची बातमी आणि विश्लेषणावर भर देऊन पत्रकारांनी पत्रकारितेतील झालेले बदल स्वीकारून सकारात्मक पत्रकारिता करावी, असे प्रतिपादन दैनिक दिव्यमराठीच्या डेप्युटी एडिटर दिप्ती राऊत यांनी केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाच्या महाआरती प्रसंगी दिप्ती राऊत बोलत होत्या. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली.

यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, जिल्हा संघटक विलास शिंगी, जिल्हा उपाध्यक्ष छबुराव ताके, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, ज्येष्ठ पत्रकार सुधीर कोर्टीकर, कार्यालय प्रमुख संजय व्यापारी, सहसचिव संदीप घंटे, अतुल खंडगावकर, छायाचित्रकार सचिन उबाळे आदींसह पत्रकारांची उपस्थिती होती.

# लोकशाहीच्या स्तंभाला धाब्यावर नेणाऱ्या प्रवृत्तींना आवरा हो...

## जाहीर वक्तव्य निषेधार्ह: आधुनिक केसरी जनचर्चेत माध्यम क्षेत्रातील मान्यवरांकडून सडेतोड प्रतिक्रिया



आधुनिक केसरी

'विरोधात बातम्या न येण्यासाठी पत्रकारांना ढाब्यावर न्या, महाविजय 2024 पर्यंत एकही बातमी विरोधात येणार नाही याची काळजी घ्या ' असे विधान भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अहमदनगर येथे भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केल्याने एकच खळबळ उडाली.त्यांचे हे विधान निषेधार्ह आहे अशा संतप्त प्रतिक्रिया समाजात उमटल्या. म्हणूनच लोकशाहीला लोकशाहीला धाब्यावर नेणा-या प्रवृत्तींना आवरा हो...अशी म्हणण्याची वेळ याप्रसंगी आली आहे. याविषयी आधुनिक केसरी जनचर्चेत माध्यम क्षेत्रातील मान्यवरांकडून सडेतोड प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या...

जनचर्चा

**लोकशाहीच्या स्तंभाला डिवचू नये :** वृत्तपत्र हे समाजाचा आरसा आहे.सामाजीक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रात घडणा-या घडामोडींचे खरेखुरे चित्र वाचकांसमोर आणण्यासाठी पत्रकार हे जीवाचे रान करून प्रसंगी धोका पत्करून जोखमीचे काम करीत असतात आणि वाचकही तितकाच प्रसिद्ध होणा-या बातम्यांवर विश्वास ठेवतो हीच मोठी गोष्ट आहे.लेखनीत एका "दम" आहे. क्षणात होत्याचं नव्हतं होते.,याची जाणीव मनी धरून नुकताच एका पक्षाच्या नेत्यांनी पत्रकारांना "मूठीत" ठेवण्यासाठी लाजीरवाणी भाष्य केले आहे. त्यांनी सूर्यावर थूंकण्याचा प्रयत्न केला आहे.पत्रकाराविषयी बोलताना जरासं भान ठेवावे. प्रखड,निर्भिड, लोकशाहीच्या स्तंभाला डिवचण्याचे काम करू नये.पत्रकारांना धाब्यावर नेण्याची भाषा करणा-यांनाच वेळप्रसंगी "धाब्यावर " बसवण्याचे बळ लेखणीत आहे. याचा विसर पडू नये हे लक्षात ठेवावे.
**- बाबुराव पाटील, जेष्ठ पत्रकार भोकर**

**पत्रकारितेचे समीक्षण व्हावे:** पत्रकाराचा स्तर उंचावलेलाच होता, काही पत्रकार आजही समाजभान ठेवूनच स्वाभिमानी पत्रकारिता करतात. मात्र २०१५ पासून पत्रकारितेचा स्तर खाली आला, हे सत्य आहे. हा स्तर खाली का आला, याचे समिक्षण केल्यास आजच्या पत्रकारिते मधील विदारक सत्य बाहेर येईल.
**- केवल जीवनतारे, जेष्ठ पत्रकार, नागपूर**

**माकड चाळे थांबवा :** निवडणुकीच्या मोसमात राजकीय माकडे चाळे करू लागतात. सत्तेची दारू ढोसलेल्या माकडांचे विचारायलाच नको. सगळेच आता खालच्या पातळीवर आले आहेत, पत्रकार कसे अपवाद राहतील? लोकशाहीच्या तमाशात सगळेच विदूषक झाले आहेत. राजा, राणी, प्रधान, सेनापती, हुजऱ्या, शिपाई ही नावे वेगळी असली तरी ते सगळे विदूषक आहेत!
**- अमर हबीब, जेष्ठ पत्रकार, अंबाजोगाई**

**पत्रकारांनी गंभीरपणे कार्य करायला हवे :** वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. शासनव्यवस्था आणि समाजव्यवस्थेवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी लोकशाहीत वृत्तपत्राची फार गरज असते. भारत स्वातंत्र्य करण्यासाठी इथल्या वृत्तपत्राने, पत्रकाराने फार मोठी जबाबदारी बजावली आहे. राष्ट्राभिमान,देशाभिमान अशी मूल्य सामान्य माणसांच्या मनी रुजवण्यासाठी वृत्तपत्राची फार मदत झाली आहे. आताच्या काळात लोकशाहीची मूल्ये रुजविण्यावर वृत्तपत्राचा भर असायला हवा. विष्णूशास्त्री चिपळूणकर, बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ गणेश आगरकर, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेने जे समाजव्यवस्थेला दिले ते अंत्यत महत्वाचे आहे. ती परंपरा आजच्या पत्रकाराने चालवणे काळाची गरज आहे. बहुतांशी अनेक पत्रकार जीव मुठीत घेऊन ती परंपरा जतन करण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसतात. वेळप्रसंगी आपला जीवही गमावतात. (अशांची संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे) अशा पत्रकाराविषयी गरळ ओकणे हे निषेधार्य आहे. निषेध करावा तेवढा कमीच आहे.'विरोधात बातम्या न येण्यासाठी पत्रकारांना ढाब्यावर न्या, महाविजय २०२४ पर्यंत एकही बातमी विरोधात येणार नाही याची काळजी घ्या 'असे वक्तव्य करणे म्हणजे लोकशाहीची हत्या करणे होय. त्यांना खूप वाईट मार्गाला घेऊन जाण्यास प्रवृत्त करणे हाही गुन्हा आहे. त्याचबरोबर या वक्तव्याचा आजच्या पत्रकारानेही गंभीरपणे विचार करून पत्रकारिता करणे गरजेचे आहे. अनेक पत्रकार पत्रकारितेला गंभीर घेताना दिसत नाहीत. योग्य,वास्तव आणि न्यायी बातम्यानाही काही पत्रकार स्थान देताना दिसत नाहीत. हेही वास्तव आजच्या पत्रकारांने समजून घ्यायला हवे. आज हल्ली ग्रामीण भागामध्ये विषमतामय पत्रकारिताही मोठ्या प्रमाणावर दिसून येते आहे.(टी.व्ही वरही दलित, आदिवासी, भटके व इतरांचे काही दाखवले जात नाही. उलट त्यांचा आवाज दाबला जातो.) जाहिराती देणाऱ्यांच्याच बातम्यांना प्राधान्य दिले जाते. अन्याय,अत्याचाराच्या अनेक बातम्या दाबल्या जातात. त्यामुळेच की काय अशांना बरळायला संधी मिळते.ती संधी न देता पत्रकाराने गंभीर होऊन मानवी कल्याण आणि मानवहित, देशहित साधणारी व लोकशाहीचे मूल्य रुजवणारी पत्रकारिता करायला हवी. **- प्रा. डॉ. सतीश मस्के, साहित्यिक, पिंपळनेर (धुळे)**



**पत्रकारांनी निष्ठा सोडू नये :** धाब्यावरची पत्रकारिता ज्याची त्याला लखलाभ..!पण PRESS मध्ये गेलो तर स्वखर्चाने चहा,कॉफी सन्मानपूर्वक पाजणारे आपले पत्रकार मित्र अजूनही निष्ठा सांभाळून आहेत.
**- डॉ. मच्छिंद्र चोरमारे, साहित्यिक नागपूर**

**अखेर उलगडा झाला :** सन्माननीय बावनकुळे महोदय काहीही चुकीचे बोलले नाहीत. तर ते प्रथमच खरे बोलले आहेत. भाजपा किंवा राजकीय पक्ष प्रसारमाध्यमांना कसे हाताळतात हेच यातून दिसून आले, यामुळे भाजपच्या सत्तेच्या काळात प्रसारमाध्यमे ही भाजपचे सक्रिय कार्यकर्ते व प्रचारक असल्यासारखे एकांगी का वागत आहेत. एक सुरात सत्ताधारी वर्गाचा महिमा का गात आहेत याचा अखेर उलगडा झाला. दिल्ली ते गल्ली भाजप प्रसारमाध्यमांचा कसा खुबीने वापर करतो. हेच त्यांनी त्यांच्या वक्तव्यातून अधोरेखित केले आहे.
**- रणजित डांगे, (संपादक - लोकनायक मीडिया न्यूज नेटवर्क.)**

**आता पत्रकारांनी भूमिका ठरवावी :** अहमदनगर येथे भाजपा कार्यकर्त्यांना प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी येत्या मार्चपर्यंत आपल्या भाजपाच्या विरोधात बदनामी करणारी एकही बातमी वर्तमानपत्रातून छापून येऊ नये याची काळजी घेण्याची आवाहन केले.त्यासाठी पत्रकारांना धाब्यावर नेऊन मनसोक्त खाउपिऊ घाला असा सल्ला दिला.खरे तर ही गोष्ट आजच्या राजकारणातल्या जेष्ठ आणि अनुभवी व्यक्तींना बोलून शोभणारी आहे का?असा एक नवीन प्रश्न उपस्थित होतो.एकीकडे या देशातील लोकशाहीला संपविण्याचा हा प्रकार आहे असे म्हणायला हरकत नाही.देशाच्या आणि लोकांच्या कल्याणाच्या योजना बाजूला ठेवून पत्रकारांना खरेदी करण्याचे आणि त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवून आपल्या भाजपाच्या बातम्या वर्तमानपत्रात कशाप्रकारे येणार नाही याची पुरेपूर काळजी घेण्याची सूचना दर्शविणारे हे वक्तव्य आहे.लोकशाही आपण खरंच योग्य दिशेने नेत आहोत का? ज्या सत्ताधार्यांनी देशाचा आणि समाजाचा विकास करायचा ते सत्ताधारी आज मोठा प्रमाणात पैसा खाऊन,ज्याला पाहिजे त्याला पैशाच्या आधारावर खरेदी करण्याचा प्रयत्न करीत आहेत.आणि आता तर पत्रकारांनाही जेवण-दारू पाजून विकत घ्यायला निघालेत. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून आपण पत्रकारितेला ओळखतो.परंतु ही पत्रकार आणि वर्तमानपत्रेच विकत घेण्याची त्यांची प्रक्रिया आता मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. मग जनसामान्यांनी काय करायचे असा एक प्रश्न आता उपस्थित होतो आहे?

खरे तर चंद्रशेखर बावनकुळेसारख्या नेत्यांना असे वक्तव्य करताना आपण काय बोलतो? कुणाविषयी बोलतो?कुणासमोर बोलतो आणि कशासाठी बोलतो याचे शास्त्रशुद्ध भान ठेवायला हवे.कारण पदावर असलेला कोणताही व्यक्ती हा या देशाचा जबाबदार व्यक्ती असतो. ज्या पक्षाचे आपण कार्यकर्ते,नेता आहोत तो पक्ष आज आपल्या देशाला देशोधडीला देऊन राहिलेला आहे. काँग्रेसने जी या देशाची मागील पन्नास वर्षात प्रगती केली त्यापेक्षा खरोखरच आपण मोठी प्रगती आपल्या देशाची करतो आहेत का? यावरसुद्धा थोडा विचार करायला हवा. एकीकडे बेरोजगारीचा मोठा प्रश्न तरुणांच्या आयुष्यावर घाला घालत असताना दुसरीकडे आपण केवळ आपल्या स्वार्थासाठी आपल्या गटातटाचा विचार करायचा आणि दुसऱ्या गटांना मातीत घालायचे?हे कुठपर्यंत योग्य आहे.चंद्रशेखर बावनकुळेसारख्या इतर भाजपाच्या नेत्यांच्या मनात पत्रकार आणि देशाच्या विकासासाठी कोणते विचार शिजत असतील? याची आपणास कल्पना येते.आता बावनकुळेच्या तोंडून तर शब्दांचा बाण निघाला परंतु आता पत्रकार मात्र कोणत्या बाजूने भूमिका घेतील?त्याच्या बाजूने जाऊन धाब्यावर बसतील की सत्याची भूमिका घेऊन त्यांच्या विरोधात आपल्या लेखण्या पाजळून विरोध दर्शवतील हे पाहणे आवश्यक आहे. **- डॉ.अनंता सूर, साहित्यिक वणी, जि. यवतमाळ**

**यापुढे असे वक्तव्य करण्याची हिंमत करू नका :** समाजातील विविध घटणा घडामोडीवर आधारीत वृत्तपत्रातून बातम्या प्रसिद्ध होतात. त्यामुळे जगात कुठे काय चाललंय याची घर बसल्या माहिती मिळते.शहरी आणि ग्रामीण भागातील पत्रकार नेहमी सतर्क असतात म्हणून वाचकांची भूक भागते. समाजातील काही घटक पत्रकारांना हातचं बाहुले बनवून खेळण्याचा प्रयत्न करतात .त्यास बळी न पडता प्रखर लेखनाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन केलं जातं ही अभिमानाची गोष्ट आहे.पत्रकारांना अनेक संकटातून मार्गक्रमण करावे लागते तेव्हा कुठे सत्य उजेडात येत.यावर पांघरूण घालण्यासाठी काही राजकीय मंडळी "दबाव" तंत्राचा वापर करून पोळी भाजून घेतात.अशा बाबींना पत्रकार न घाबरता काम करतात. नुकतेच भाजपाच्या नेत्यांनी "पत्रकारांना धाब्यावर बसवून काबीज करा," असा सल्ला कार्यकर्त्यांना दिला आहे.लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला कुणीच विकत घेऊ शकत नाही.आणि काबीज करू शकत नाही.राजकीय नेत्यांना अशी भाषा शोभत नाही. यापुढे असे वक्तव्य करण्याची कुणी हिंमत करू नये. त्या विधानाचा निषेध आहे. **- बी.आर. पांचाळ, पत्रकार तथा सावली प्रतिष्ठान अध्यक्ष, भोकर**

**माध्यमांना स्वतःची मालमत्ता समजू नये :** समाजातील विविध घटकांना न्याय देवून वृत्तसेवा आपली चोख भूमिका बजावते आहे.वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणारे लेख, बातमी,ईतर माहितीने समाजप्रबोधन आणि परिवर्तन केले जात आहे. अनेकांना न्याय मिळवून दिला आहे.लोकशाहीचा हा चौथा आधार स्तंभ आजही तीच भूमिका घेवून अविरत काम करत आहे.काही राजकीय मंडळी आणखी हवेतच वावरताना दिसत आहेत.त्यांनी माध्यमे म्हणजे आपली स्वतःची मालमत्ता समजली आहे. स्वतःच चांगभलं करून घेण्यासाठी "पत्रकारांना धाब्यावर बसवून मायाजालात गूरफटून टाका म्हणजे बातम्या विरोधात छापणार नाहीत " असे फर्मान सोडले आहे.लोकशाहीत नेत्यांच्या बाबतीत अशी भावना अशोभनीय आहे. ते खरंच निषेधार्थ आहे असं मला वाटतं.
**- प्रा. डॉ. सतीश मस्के, साहित्यिक, पिंपळनेर (धुळे)**

# उदयनिधींचा दावा

आधुनिक केसरी

तमिळनाडूत भाजपाला मोठा धक्का बसला आहे. तमिळनाडूतील अण्णा द्रमुक पक्षाने एनडीएची साथ सोडली आहे. आगामी लोकसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याची त्यांनी घोषणा केली आहे. अण्णा द्रमुकच्या या खेळीमुळे भाजपासमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. स्वबळावर भाजपाला तमिळनाडूत नशीब आजमावून पाहावं लागणार आहे. परंतु, अण्णा द्रमुक आणि भाजपा पुन्हा एकत्र येतील, असा विश्वासही भाजपा नेत्यांकडून व्यक्त केला जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर द्रमुकचे नेते आणि तमिळनाडूचे मंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी याबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. अण्णा द्रमुकने भाजपाशी संबंध तोडले तरी २०२४च्या लोकसभा निवडणुकीत द्रमुक विजयी होणार आहे. अण्णा द्रमुक आणि भाजपाची युती तुटल्याचं के.पी. स्वामी यांनी जाहीर केलं आहे. अण्णा द्रमुक आणि भाजपा यांची युती असो वा नसो, द्रमुकच जिंकणार आहे. तुम्ही लोकांना फसवू शकत नाहीत. ही युती तुटल्याचं तुमचे स्वतःचे कार्यकर्ते मान्य करणार नाहीत. का? कारण, तुमच्या माजी मुख्यमंत्री आणि मंत्र्यांची ईडीच चौकशी सुरू आहे", असं उदयनिधी स्टॅलिन म्हणाले. द्रमुकच्या तरुण कार्यकर्त्यांच्या बैठकीत उदयनिधी बोलत होते. हे पहिल्यांदा घडत नाही. हे दोन्ही पक्ष स्वबळावर लढण्याची घोषणा करतील, पण निवडणुकीच्या वेळी हे दोन्ही पक्ष एकत्र येतील. कारण, एक दरोडेखोर आहे आणि दुसरा चोर आहे, अशीही टीका उदयनिधी यांनी केली. अण्णा द्रमुक भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून बाहेर पडले आहे. आगामी २०२४ ची लोकसभा निवडणूक समविचारी पक्षांच्या आघाडीचे नेतृत्त्व करून लढवण्याचे पक्षाने जाहीर केले आहे. पक्षप्रमुख ई.के. पलानीस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. समविचारी पक्षांना बरोबर घेऊन पक्ष निवडणूक लढवेल असे माजी मंत्री के.पी.मुनुस्वामी यांनी जाहीर केले. पक्षाने एका ठरावात कोणाचाही नामेल्लेख न करता भाजपच्या प्रदेश नेतृत्त्वावर टीका केली आहे. द्रविडी चळवळीतील नेतृत्त्वाला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप ठरावात करण्यात आला आहे. पक्षाचा रोख भाजप प्रदेशाध्यक्ष के.अण्णामलाई यांच्याकडे आहे.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# व्यक्ती जन्माने नाही, तर कर्माने श्रेष्ठ!

आधुनिक केसरी

**सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी बहुजनांचे कैवारी महात्मा जोतिबा फुले यांनी घटना बनविली. तद्रुषंगाने नियमावली तयार केली. मूलतः सत्यशोधक समाज एक निर्मिक, एक मानवता धर्म व एक मनुष्यजात मानणारा म्हणून स्थापन झाला. त्याची आचारसंहिता सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात दिली असून त्यात ढोबळ नियम सांगितले आहेत. त्यांनुसार समाजाच्या कार्यकारिणीत सुरूवातीस म. जोतीरावजी फुले हे चिटणीस आणि डॉ.विश्राम रामजी घोले हे अध्यक्ष होते. शिक्षणसम्राट महात्मा जोतिरावजी फुलेंनी दि.२४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. वर्षातून कार्यकारिणीच्या सर्वसाधारण चार सभा, लोकशाही पद्धतीने कार्यकारी मंडळाची निवड व बहुमताने निर्णय, अशी सर्वसाधारण सूत्रे होती.**

सुरूवातीस दर रविवारी डॉ.गावडे यांच्याकडे अनौपचारिकरीत्या मंडळी जमत. समाजापुढील प्रश्न, सोडवणुकीचे उपाय व सद्यःस्थिती यांविषयी चर्चा होत आणि दर पंधरा दिवसांतून एक व्याख्यान असा उपक्रम असे. सत्यशोधक समाजातील व्यक्तींनी काही सूत्रे काटेकोरपणे पाळावीत, अशी भूमिका ठरली. त्या प्रतिज्ञा- १) ईश्वर-निर्मिक एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार व सत्यरूप आहे आणि सर्व माणसे त्याची लेकरे आहेत. या निर्मिकाशिवाय मी इतर कशाचीही पूजा करणार नाही. २) निर्मिकाची भक्ती करण्याचा पूर्ण अधिकार प्रत्येकाला आहे. त्यासाठी पुरोहित किंवा मध्यस्थाची आवश्यकता नाही. ३) माणूस जातीने श्रेष्ठ ठरत नसून कर्मगुणांनी श्रेष्ठ ठरतो. ४) निर्मिक सावयव रूपाने अवतरत नाही. ५) पुनर्जन्म, परलोक, मोक्ष, कर्मकांड, जपतप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत. त्यांचा अवलंब माझ्याकडून होणार नाही. ६) जनावरांना मारण्यात मी सहभागी होणार नाही. ७) दारूच्या व्यसनापासून अलिप्त राहण्याचे मी प्रयत्न करीन आणि ८) समाजाचा खर्च चालावा म्हणून मी माझ्या उत्पन्नातून काही वर्गणी देईन. "**भटीण शुद्रांची करीना मजुरी।। काढणी न करी।। शेतामध्ये।।१ ।। शुद्रांचीया खळीं मजुरी करीना।। नखरा सोडीना।। जोती म्हणे।।४।।" (पवित्र अखंडादी काव्यरचनाः विभाग-६ - कुळंबीणः अखंड क्र.१२).**

जमीनदार, शेटजी व पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून, गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. "निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक! भांडणे अनेक कशासाठी?" हा विचार म.फुले यांनी मांडला. देवाविषयी किंवा निसर्गाविषयी निर्मिक हा शब्द वापरला, त्यावरुन सत्यशोधक समाज अर्थातच म.जोतिबा फुले आस्तिक होते, हे स्पष्ट होते. त्यांनी कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी गुलामगिरी हा उपदेशपर ग्रंथ लिहिला. त्यानंतर महाराष्ट्रात पंतोजी व शेटजींच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करण्यासाठी चळवळ सुरू करण्याचा निर्धार केला. महात्मा जोतिबा फुले हे क्रांतिकारी नेते असल्याने त्यांच्या वृत्तीशी सुसंगत व धोरणाला पोषक असे तत्त्वज्ञान तथा व्यासपीठ निर्माण करणे, त्यांना अत्यंत गरजेचे वाटले. यातूनच सत्यशोधक समाजाची निर्मिती झाली. सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान मानताना एकेश्वरवाद, ईश्वरभक्ती, व्यक्तीचे श्रेष्ठत्व त्याचप्रमाणे ग्रंथप्रामाण्याला विरोध असावा. सत्य हेच परम लक्ष्य व मानवी सद्‌गुणांची जोपासना करणे, अशाप्रकारे वैचारिक आणि प्राथमिक भूमिका घेऊन सत्यशोधक समाजाने आपले तत्वज्ञान मांडले. ईश्वराची भक्ती ही निरपेक्ष भावनेने असावी. त्यामध्ये मध्यस्थाची अथवा बट भिक्षूची आवश्यकता नाही, याचे प्रतिपादन सत्यशोधक समाजाने केले. त्याचप्रमाणे व्यक्ती ही जन्माने श्रेष्ठ नसून ती गुणकर्माने श्रेष्ठ ठरते. याचे स्पष्टीकरणही सत्यशोधक समाजाने दिले. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक व पुनर्जन्म या गोष्टीला त्यांनी थारा दिला नाही. तर सत्य हेच परब्रह्म आहे, अशा प्रकारचा विचार सत्यशोधक समाजाने मांडला. मानवाच्या अंगी असलेल्या सद्‌गुणांची जोपासना व्हावी, हा विचार दृढ करण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला. "**काया पुरती लंगोटी। फिरती नांगराचे पाठी।।१ ।। एका घोंगड्यावांचूनी। स्त्रियां नसे दुजे शयनी।।२ ।। ढोरांमागे सर्वकाळ। पोरें फिरती रानोमाळ।।३ ।। ताक कण्या पोटभरी। धन्य म्हणे तो संसारी।।४।।**" (पवित्र म.फुले समग्र वाङ्मयः गुलामगिरीः अभंग १ला). सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो तो हा- सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथामध्ये म.फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांना प्रस्तूत केले आहे. मानवता धर्माची शिकवण सत्यशोधक



समाजाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला गेला. सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवताना सत्यशोधक समाजाने समाजातील दीनदलित उपेक्षीत समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाजातर्फे 'दीनबंधू' नावाचे एक साप्ताहिक मुखपत्र म्हणून चालविले जात असे. या वृत्तपत्राचे संपादक कृष्णराव भालेराव हे होते. त्यांनी दि.१ जानेवारी १८७७मध्ये पुणे येथे स्थापन केले होते. हे वृत्तपत्र मराठी भाषेत होते. लोकशिक्षण व लोकजागृती प्रभावी माध्यम म्हणून दिनबंधुचा उल्लेख करावा लागतो. "सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती॥" हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरी विरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजातर्फे आवश्यक सुधारणा अशी करण्यात आली- पुरोहिताशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. त्यासाठी मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाजाचे मुंबई शाखेचे अध्यक्ष नारायण मेघाजी लोखंडे हे होते. इ.स १८९०मध्ये यांनी दिनबंधु या वृत्तपत्राचे संपादन आणि मुद्रण मुंबई येथून केले. "**पोटीं बाळगून जन्म त्यास दिला।। पाजीला पोशीला।। माऊलीनें।।१ ।। आर्यपाखंडानें माते कष्ट देती।। अधोगती जाती।। जोती म्हणे।।४।।**" (पवित्र अखंडादी काव्यरचनाः विभाग-१ - मानवी स्त्रीपुरुषः काव्य क्र.१६) कमीअधिक प्रमाणात सत्यशोधक चळवळ झपाट्याने, काही वेळा मंदपणे फोफावत असली, तरी सत्यशोधक समाजाच्या वतीने तिच्या ध्येय-उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठीच चळवळीचे हे महायान सुरू होते. लोकजागरण, लोकप्रबोधन, लोकसंघटन आणि नव समाजनिर्मिती या सत्यशोधक समाजाच्या ध्येयसिद्धीसाठी हा सारा खटाटोप व उभा प्रयास होता. सन १८७३मध्ये सत्यशोधक समाजाची म.फुले यांनी स्थापना केली, मात्र समाज अधिवेशनांची सुरूवात सन १९११पासून झाली. तर सन २००७पर्यंत सत्यशोधक समाजाची एकूण ३५ अधिवेशने संपन्न झाली. पहिले अधिवेशन १७ एप्रिल १९११रोजी पुणे येथे स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावरू यांच्या अध्यक्षतेने पार पडले. त्याच्या स्वागताध्यक्ष पदी गणपतराव बिरमल होते. पस्तीसावे अधिवेशन २२ डिसेंबर २००७ रोजी गेवराई जिल्हा बीड, मराठवाडा येथे डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. मराठवाडा सार्वजनिक सभेचे अध्यक्ष पद्माकरराव मुळे यांनी स्वागताध्यक्ष पद भूषविले होते.

!! समस्त बहुजन वर्गातील बंधुभगिनींना सत्यशोधक समाज स्थापना दिनाच्या सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# 'गुगल' गुरूचा वाढदिवस!

आधुनिक केसरी

**आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे.**

आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे. अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!




हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पावसाअभावी पिके चालली वाळून; परिसरातील जलसाठे कोरडे

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश दनके**

**वडोद बाजार :** दैनिक आधुनिक केसरीचे प्रतिनिधी रमेश दनके यांनी वडोद बाजार परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकाच्या आढावा घेतला असता परिसरात भविष्यात पाणीटंचाईचा मोठा प्रश्न निर्माण होणार असून पावसाअभावी पिके वाळत चालले असून शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसणार असून जनावरांसाठी मिळणारा मुबलक चारा मिळणार नाही तर उत्पन्न सुद्धा मिळणार नाही त्याच शेतकऱ्यांना फटका बसणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपली जनावरे सांभाळणे कठीण होणार आहे. शेतकऱ्यांना या अल्पपावसामुळे मोठा आर्थिक फटका बसणार आहे. पावसाअभावी शेतकऱ्यापुढे मोठे संकट निर्माण होणार असून या शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळण्याची शेतकऱ्यांना आशा आहे. गिरजा नदीचे पात्र कोरडे, गिरजा नदीवरील कोल्हापुरी बंधारे कोरडे पडल्याने परिसरात भविष्यात पाणीटंचाईचा मोठा सामना करावा लागणार आहे. फुलंब्री तालुक्यात गिरजा नदीचे पात्रातून विविध ठिकाणी कोल्हापुरी बंधारे बनवण्यात आले असून अर्धा पावसाळा संपला तरीही या गिरणा नदीला छोटा मोठा पूर आलेला नसून या नदीच्या पात्रावरील कोल्हापुरी बंधारे कोरडेच आहे. फुलंब्री तालुक्यात वडोद बाजार परिसरात अर्धा पावसाळा संपला तरीही अत्यल्प पाऊस पडल्यामुळे परिसरातील नद्या नाले कोरडेच आहे. तीन महिने पावसाळा संपला तरीही जोरदार पाऊस परिसरात जोरदार पाऊस पडलेला नसून अल्प पावसावर पिके हिरवी आहे. पिकांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून परिसरात मोठ्या पावसाची प्रतीक्षा असल्याने दररोज शेतकऱ्याला आज पाऊस पडेल. या आशेने आभाळाकडे पाहावे लागत आहे. मात्र ऑगस्ट महिना संपत आला तरीही परिसरात जोरदार पाऊस पडला नसून पिके पावसाअभावी वाळत आहे त्यामुळे शेतकऱ्यासमोर मोठे नैसर्गिक संकट टाकले आहे. मका कापूस सोयाबीन बाजरी आधी पिके पाण्याअभावी वाळत असून शेतकऱ्यासमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. काही विहिरींना पाणी असल्याने शेतकरी या पिकांना पाणी देण्यासाठी धडपड करत आहे. परिसरात जोरदार पाऊस झालेला नसल्याने परिसरातील विहिरीच्या पाण्याची पातळी खाली गेली आहे. परिसरातील छोटे-मोठे जलसाठे तलाव कोल्हापुरी बंधारे कोरडेच असल्यामुळे भविष्यात पाणीटंचाईचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. परिसरात जोरदार पाऊस न झाल्याने पावसाअभावी पिके वाळत आहे. शासनाने शेतकऱ्यांना सरसकट मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी राजू म्हस्के यांनी केली.



# सरकार बेताल, शेतकऱ्यांचे हाल; अनिल देशमुख यांचा सरकारवर घणाघात

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** राजकीय पक्ष फोडाफोडीत मश्गूल असलेलं राज्य सरकार जनसामान्यांच्या विविध प्रश्नांकडे सपशेल दुर्लक्ष करत आहे. राज्यातील सर्वसामान्य जनतेसाठी कुठलाही नियोजनबध्द कार्यक्रम राज्य सरकारकडे नाही. परिणामी सरकारच्या या बेताल कारभारामुळेच शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत असल्याचा घणाघात राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते तथा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला आहे.२५सप्टेंबर रोजी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आढावा बैठकी दरम्यान ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

येथील जैन भवन येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत देशमुख यांनी अनेक प्रश्न उपस्थित करून सरकारच्या बेताल कारभारावर कडाडून हल्ला केला. पुढे बोलताना ते म्हणाले,निवडणुकांमध्ये स्वबळावर भाजपला यश मिळवणे दुरापास्त वाटत असल्यामुळेच त्यांनी राजकीय पक्ष फोडाफोडीचे गलिच्छ राजकारण सुरू केले आहे. केवळ राजकीय ताकद वाढविण्याकरिता भाजपाने याआधी शिवसेनेतील मातब्बरांना फोडण्याचा डाव खेळला. तो यशस्वी झाल्यानंतर, राज्यातील तळागाळापर्यंत पोहचलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला खिळखिळे करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा घाणेरड्या राजकीय खेळात मश्गूल असलेल्या सरकारचा



बेताल कारभार अनेक बाबतीत चव्हाट्यावर येत आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे, विदर्भातील अन्य जिल्ह्याप्रमाने वाशिम जिल्ह्यातही खरीप पिकांची अवस्था दयनीय झाली आहे. मुख्य पीक असलेल्या सोयाबीन पिकावर पिवळा मोझैक रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला आहे. परिणामी उत्पादनात प्रचंड घट होणार असल्याचे स्पष्टपणे दिसत असून, शेतकरी हवालदिल झाले आहेत.मात्र या गंभीर बाबीकडे सरकार मधील कुणाचेही लक्ष नाही. असा मार्मिक टोला प्रत्यक्ष नाव न घेता माजी मंत्री अनिल देशमुख यांनी अचूक लगावला आहे.

राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आढावा बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून जेष्ठ नेते अनिल देशमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना नोव्हेंबर महिन्यात नागपूर येथे पक्षाचे राष्ट्रीय नेते शरदचंद्रजी पवार यांची जंगी जाहीर सभा होणार असल्याचे घोषित केले. तर येत्या काही दिवसातच आमदर रोहीत पवार यांची जिल्ह्यात सभा होणार असल्याचे संकेत दिले.दरम्यान, अल्पसंख्यांक प्रदेश अध्यक्ष जावेद हबीब यांनी सुद्धा भाजपाचा खरपूस समाचार घेतला. जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष माधवराव अंभोरे, जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग ठाकरे, प्रा. विश्वनाथ कांबळे, प्राचार्य अरुणराव सरनाईक, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनील पाटील आदींनी आपले विचार मांडले. यावेळी मंचावर जिल्हा बँकेचे संचालक माधवराव काकडे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अनंत काळे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष वैशाली मेश्राम, अल्पसंख्यांक सेलचे डॉ. रमेश चंदनशिव, जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे, पंचायत समिती सदस्य विष्णु कोळेकर, कैलाश खानझोडे, किरण इंगोले आदी सह, बहूसंख्य पदाधिकारी व हजारोच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रवाशांना लुटणाऱ्या टॅक्सी चालकांना अटक

## पोलिसांनी गंभीर दखल घेऊन तत्काळ केला गुन्हा दाखल


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गेल्या काही वर्षांपासून लोकमान्य टिळक टर्मिनसवर रिक्षा आणि टॅक्सीचालक प्रवाशांची लूट करीत आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनसवर एका प्रवाशाला लुटणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सीचालकाविरोधात टिळकनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून या दोघांनाही अटक करण्यात आली. लोकमान्य टिळक टर्मिनसवरील काही रिक्षा आणि टॅक्सीचालक जवळच्या अंतरावर जाण्यासाठी प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर भाडे घेऊन त्यांची लूट करीत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ही लूट सुरू असून पोलीस मात्र काहीही कारवाई करत नाहीत. त्यामुळे दिवसेंदिवस प्रवाशांची लूट सुरूच आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी कुर्ला परिसरात राहणारे मोहम्मद चांद गावी जाण्यासाठी लोकमान्य टिळक टर्मिनसवर आले होते. यावेळी टॅक्सीचालक सतीश सिंह (४०) आणि रिक्षाचालक आशिष सपकाळ (२३) यांनी चांद यांच्याकडून जबरदस्ती ७०० रुपये काढून घेतले. या सर्व घटनेचा व्हीडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर टिळकनगर पोलिसांनी प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तत्काळ गुन्हा दाखल केला. प्रवासी चांद यांच्याशी संपर्क साधून पोलिसांनी रिक्षा आणि टॅक्सीचालकाची माहिती मिळवली. त्यानुसार पोलिसांनी तपास करून या दोन्ही आरोपींना चेंबूरमधील सुभाष नगर परिसरातून अटक केली. या आरोपींनी अशाच प्रकारे अनेक प्रवाशांना लुटले असून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.




महाराष्ट्र Business Katta










# शिक्षणाच्या आयचा घो....

आधुनिक केसरी

**सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांच्या खासगीकरणास राज्य सरकारने हिरवा कंदील दिला आहे. दत्तक शाळा योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, क्षेत्रनिहाय 50 लाख ते 3 कोटी रुपये शाळेस नाव देण्यासाठीचे मूल्य ठरविले आहे.शासनाने हा निर्णय मागे न घेतल्यास आगामी काळात बेमुदत शाळा बंदचा पवित्रा शैक्षणिक व्यासपीठ, मुख्याध्यापक संघाने घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाने 18 सप्टेंबर रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांच्या दत्तक योजनेसंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

त्यानुसार दत्तक शाळा योजनेच्या समन्वयासाठी समित्यांचे गठण राज्यस्तरीय समिती, क्षेत्रीय समिती, नगरपालिका शाळेसाठी समिती स्थापन होणार आहेत. या निर्णयानुसार पाच व दहा वर्षांसाठी या शाळा दत्तक देण्यात येणार आहेत. यामध्ये सर्वसाधारण पालकत्व व विशिष्ट पालकत्व अशी वर्गवारी केली आहे. विशिष्ट पालकत्व स्वीकारलेल्या देणगीदारांना शाळेला नाव देण्याची मुभा दिली आहे.पाच ते दहा वर्षांच्या कालावधीत देणगीदार व कार्पोरेट कंपन्यांसाठी शाळा दत्तक योजनेची नियमावली तयार केली आहे. 'अ' व 'ब' वर्ग महापालिका क्षेत्रात पाच वर्षे कालावधीसाठी संबंधितांनी दोन कोटी रुपयांच्या वस्तू व सेवा पुरवायच्या आहेत. दहा वर्षांसाठी तीन कोटी रुपयेच्या पुरवायच्या आहेत. 'क' वर्गसाठी ही रक्कम एक कोटी व दोन कोटी, तर 'ड' वर्ग महापालिका, नगरपालिका, ग्रामीण भागीतल शाळेसाठी सेवांचे मूल्य पन्नास लाख व एक कोटी रुपये असणार आहे.

दत्तक योजनेच्या नावाखाली सरकारने हा खासगीकरणाचा विचित्र घाट घातला असल्याची टीका जाणकारांकडून होत आहे. वास्तविक दत्तक योजनेच्या नावाखाली घेतलेल्या या शाळांना संबंधित कंपनी / व्यवस्था शाळेला आपले नाव देऊ शकणार आहे. हा प्रकार म्हणजे समाजवाद व सामाजिक न्यायाला तिलांजली देणारा असल्याचे आणि संविधानातील समान काम,समान वेतन हे तत्व पायदळी तुडविल्या जाणार असल्याचे शैक्षणिक क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे. तर शासन आपली जबाबदारी टाळत ती खासगी कंपन्यांच्या आणि उद्योगपतींच्या दावणीला बांधत असल्याचे म्हणणे आहे. राज्यातील ६२ हजार शाळा कार्पोरेट कंपन्यांना दत्तक दिल्या जाणार असल्याचा आणि कार्पोरेट कंपण्याद्वारे शिक्षक भरती केल्या जाणार असल्याचा जीआर शासनाने काही दिवसांपूर्वी काढल्याने एकच खळबळ उडाली आहे.

उद्योगपतींच्या हातात आता अशा पद्धतीने शाळा सोपविल्या गेला तर त्यात व्यापार होणार असल्याचे स्पष्टच दिसते. तोट्याचा व्यवहार उद्योगपती कधी करत नाहीत. सर्वसामान्यांच्या मुलांसाठी भविष्यात हा निर्णय अतिशय घातक ठरणार आहे.सुरुवातीला ऑल इज वेल असे चित्र निर्माण करत नंतर त्यात बदलाचे प्रयोजन ठेवून नंतर हवे तसे नियम व सुलभता त्यात आणल्या जाणार असल्याचे निश्चित आहे.  खेडोपाडी मुक्कामी जाणारी आणि सकाळीच प्रवाशांना घेऊन तालुक्याला जाणारी एसटी अनेक गावातून खासगी वाहनांमुळे आज बंद पडली आहे. तीच गत शिक्षण क्षेत्राची होणार आहे.या सगळ्या प्रक्रियेत कित्येक शिक्षक अतिरिक्त ठरण्याची देखील भीती व्यक्त केल्या जात आहे.



भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ नुसार १४ वर्षांखालील मुला-मुलींना मोफत आणि शक्तीच्या शिक्षणा च्या सुविधा पुरविणे राज्य व केंद्र सरकारला बंधनकारक आहे.शिक्षण हक्क कायदा-२००९ नुसार शिक्षण मिळणे हा हा बालकांचा मूलभूत हक्क व अधिकार आहे. राज्यसरकार वर ही घटनात्मक जबादारी असतांना सरकार त्यापासून दूर पळत आहे. सर्वसामान्य नागरिक,शेतकरी, मजूर यांच्या मुलांसाठी राज्य सरकार चा हा निर्णय जीवघेणा आहे. सातारा जिल्ह्यातील शास्ता प्रकाश कांबळे ह्या इयत्ता ५ वी मधील चिमुकली ने साताऱ्या च्या जिल्हाधिकारी यांना लिहलेले पत्र सोशल मीडिया वर चांगलेच चर्चेचे ठरले आहे. जन्मदात्री नंतर  दुसरं मातृत्व म्हणजे शिक्षण.आणि हेच मातृत्व विकण्याचा घाट सरकारने घातल्याचा उल्लेख करत वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे षडयंत्र असल्याचा गंभीर आरोप या चिमुकली ने केला आहे.ब्रिटिशांच्या काळात महात्मा फुले यांनी बहुजनांच्या हितासाठी शिक्षण सुरू केले.मात्र स्वतंत्र भारतात शून्य ते २० पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद होत आहेत.उर्वरित शाळा उद्योगपतींना दत्तक दिल्या जाणार आहेत.सरकारी शाळा चालविण्याची पात्रता सरकार मध्ये नसेल तर या सरकारचा उपयोग तरी काय..? असा सवाल उपस्थित करत मातृत्व अबाधित ठेवण्याची प्रांजळ अपेक्षा या चिमुकलीने व्यक्त केली आहे.  परंतु उद्योगपतींच्या हातचे बाहुले बनलेले सरकार याला चांगुलपणाचा मुलामा चढवून आपला निर्णय कसा योग्य आहे,हे ठासून सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# दारूच्या दुकानांची संख्या वाढविण्याचा सरकारचा विचार

आधुनिक केसरी

**राज्यात दारू विक्रीच्या दुकानांचे नवीन परवाने देणे 1973 पासून बंद असतांना आता दारू उत्पादक कंपन्यांना नवीन विक्री परवाने देण्याचे उत्पादन शुल्क विभागाने प्रस्तावित केले आहे.उत्पादन शुल्क वाढीसाठी हा प्रस्ताव उपमुख्यमंत्री व वित्तीय मंत्री अजित पवार यांच्याकडे दिली आहे.ही बातमी दिनांक 25 सप्टेंबर 2023 रोज सोमवारला अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली आहे. याचे कलार समाजातर्फे स्वागतच. दारू विक्रीच्या परवान्यांची संख्या वाढविण्याचे यापूर्वी गेल्या तीसचाळीस वर्षांत अनेकदा प्रस्ताव आले.पण त्यावर झालेल्या टिकेनंतर असे परवाने देण्यात आले नव्हते.**

परंतु आता दारू उत्पादक कंपन्यांना प्रत्येक जिल्ह्यात किरकोळ दारू विक्रीचे एक दुकान उघडण्यास मुभा देण्याचे प्रस्तावित आहे.असे अनेक वर्तमानपत्रांच्या माध्यमातून प्रसिद्ध झाले आहे. सरकारने राज्यात आतापर्यंत 18 हजार परवाने दिले आहेत. त्यात रेस्टॉरंट,बारचाही समावेश आहे.उत्पादन शुल्क विभागाचे म्हणणे आहे की सात हजार रेस्टॉरंट,बारमधून दारू बॉटलची विक्री करण्याची परवानगी द्यावी आणि त्यासाठी प्रत्येकाकडून पाच लाख रुपये शुल्क घ्यावे, त्यातुन साडेतीनशे ते चारशे कोटी रूपयांचे उत्पन्न सरकारला होईल, असेही उत्पादन शुल्क विभागाने सुचविले आहे.या संपूर्ण धोरणांचे कलार समाजातर्फे स्वागतच.परंतु दारूच्या दुकानांचे परवाने वाढविताना सरकारने कलार समाजाचा विचार करावा.कारण दारूच्या दुकानांचा पहिला अधिकार कलार समाजाचा आहे आणि त्यात नुकतीच माननीय पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी पारंपारिक व्यवसायाचा दुजोरा देवून यात भर दिली आहे. विश्वकर्मा योजने अंतर्गत पारंपरिक व्यवसायवर प्रधानमंत्र्यांनी भर दिला आहे याचे कलार समाजाने स्वागतच केले आहे.त्याचं अनुषंगाने सरकारने नवीन परवाने देताना कलार समाजाच्या पारंपारिक(मद्य) व्यवसायाचा गांभीर्याने विचार करावा. प्रधानमंत्री यांनी आतापर्यंत अनेक विकास कामांना गती दिली व आताही देत आहे.प्रधानमंत्र्यांनी वाढदिवसा निमित्त पारंपारिक कारागिर व शिल्पकारांसाठी 13 हजार करोडची पीएम विश्वकर्मा योजना लॉन्च केली.ही योजना पारंपारिक व्यवसायिकांना शंभर टक्के लाभदायक ठरेल यात तिळमात्र शंका नाही.या योजनेचे प्रधानमंत्र्यांचे जेवढे कौतुक कराल तेवढे कमीच आहे.या योजनेत 18 पारंपारिक व्यवसायाचे क्षेत्र आहेत.यामध्ये सुतार,नाव निर्माता,अस्त्र बनविणारे, लोहार,हथौडा व टूल किट निर्माता,ताला बनविणारे,सोनार, कुंभार, मूर्तिकार, मोची,राजमिस्त्रि,टोकरी/चटाई/झाडू निर्माता,जूट बुनकर, खिलौना निर्माता, नाव्ही,माळ बनविणारे, धोबी,दर्जी,मच्छ्या पकडण्याचे जाळ बनविणारे अशा प्रकारच्या समाजाच्या पारंपारिक व्यवसायाला पीएम विश्वकर्मा योजने अंतर्गत लाभ घेता येणार आहे.हा पारंपारिक व्यवसायिकांसांठी अत्यंत लाभदायी आणि संजीवनी ठरेल याचा मला पुर्ण विश्वास आहे. प्रधानमंत्री यांनी अमलात आनलेल्या पारंपारिक व्यवसायाचा विचार केला तर, यालाच अनुसरून  महाराष्ट्रा सरकारला पारंपरिक व्यवसायाच्या दृष्टीकोणातुन कलार समाजाला बाजूला सारता येणार नाही किंवा दखल अंदाज करता येणार नाही ही बाब महाराष्ट्र सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.कारण महाराष्ट्र सरकारचा उत्पादन शुल्क विभाग राज्यात दारूच्या दुकानांची संख्या वाढविण्याच्या तयारीत आहे.त्यामुळे पारंपारिक व्यवसायाच्या दृष्टीकोणातुन व प्रधानमंत्री यांनी घोषित केलेल्या विश्वकर्मा योजने अंतर्गत पारंपारिक व्यवसायाच्या दृष्टीकोणातुन 100 टक्के कलार समाज यात फिट बसतो.त्यामुळे यात कोणीही ढवळाढवळ करू नये व नवीन परवाने देतांना फक्त कलार समाजाचाच विचार करावा अशी महाराष्ट्र सरकारला आग्रहाची विनंती आहे.कारण कलार समाज हा मुळातच आदिवासी आणि मागासलेला समाज आहे. त्यामुळे आपल्या पारंपारिक मद्य व्यवसायाच्या माध्यमातून आपल्या परिवारांची उपजिविका करीत असे.परंतु स्वतंत्र पुर्वकाळात भारतातील प्रत्येक समाजाने स्वतंत्र मिळवण्यासाठी कठोर परिश्रम व आपापल्या पद्धतीने प्रयत्न केले.कलार समाजाचा व्यवसाय मद्य बनवून विकने हा होता यावरच समाजबांधवांची उपजिविका होती.परंतु स्वतंत्र आंदोलनात दारूचा(मद्यचा) विपरीत परिणाम होवू नये.यासाठी महात्मा गांधींनी 24 में 1934 रोजी कलार समाजबांधवांना आग्रह केला की आपल्याला स्वातंत्र पाहिजे असेल तर स्वतंत्र मिळेपर्यंत आपल्या पारंपारिक व्यवसायाचा त्याग करावा लागेल.कारण याचा आंदोलकांवर विपरीत परिणाम होवू शकतो असे मला वाटते.त्यामुळे समाज बांधवांनी महात्मा गांधींना म्हटले की तुम्ही फक्त आम्हाला आदेश द्यावा तुमच्या आदेशाचे पुर्णपणे पालन होईल.तुमचा आदेश म्हणजे देशाचा आदेश असे आम्ही मानतो.कलार समाजाची दारूबंदी फक्त स्वतंत्रपुर्वकाळापर्यंतच होती.स्वतंत्र मिळाल्यानंतर कलार समाजाने आपला व्यवसाय पुन्हा पुर्ववत सुरू केला.परंतू हा व्यवसाय अत्यंत लाभदायक आहे असे राजकीय पुढाऱ्यांच्या व पुंजीपतींच्या लक्षात आले आणि कलार समाजाच्या पारंपारिक व्यवसायावर कुर्हाड चालवीली व तेव्हापासून लायन्स (परवाना) पध्दती अमलात आली आणि स्वातंत्र्यानंतर कलार समाजाच्या व्यवसायाचे राजकारण झाले.अशा परिस्थितीत कलार समाजाला सरकारने तोंडाला पाणे पुसण्याइतके फक्त 1 टक्के दारूचे परवाने दिले व 99 टक्के कलार समाज बांधवांना वाऱ्यावर सोडले आणि कलार समाजाचे हिसकावलेले 99 टक्के परवाने राजकीय पुढारी,त्यांचे नातेवाईक व पुंजीपती यांना परस्पर वाटुन दिले आणि सरकारने विश्वासघात केला. आज मराठा समाजाचे आंदोलन सरकारच्या मानगुटीवर आले म्हणून निजामकालीन वंशावळी मागता.परंतु कलार समाज भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या पारंपारिक व्यवसाय (मद्य व्यवसाय) यापासून सरकारने कोसोदुर नेवुन ठेवले त्याचे काय?असाही प्रश्न उपस्थित होतो.खरे पहाले तर कलार समाज आत्मनिर्भर होता. परंतु काही राजकीय पुढाऱ्यांनी कलार समाजाचा वारंवार वापर करून विश्वासघात केला.कलार समाजाने अनेकदा आवाज उचलला की सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदी करावी अन्यथा कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय परत करावा.जर महाराष्ट्रात दारू बंदी होत असेल तर कलार समाज त्याचे स्वागतच करेल.

# लोककल्याणकारी  क्रांतिकारक संत तुकाराम महाराज

आधुनिक केसरी

**मायबापे अवघी काशी।   तेणे न भजावे तीर्थाशी।।   तुका म्हणे मायबापे।**
**अवघी देवाचीच रुपे।।**

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाऊन दगडधोंड्यांची पूजा करण्यापेक्षा कुटुंबातील आई-वडील, भाऊ-बहीण, मुलं, पत्नी यांचा आदर-सन्मान करा. गोरगरिबांना मदत करा. शेजाऱ्यांशी प्रेमाने वागा, हे संत तुकाराम महाराजांचे लोककल्याणकारी विचार आहेत. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाऊन फलप्राप्ती होणार नाही, असे संत तुकाराम महाराज म्हणतात.

**जाऊनिया तीर्था काय तुवा केले।**
**चर्म प्रक्षाळीले वरी वरी।।**
**तीर्थी धोंडा पाणी।**
**देव रोकडा सज्जनी।।**
**नाही निर्मळ जीवन।  काय करील साबण।।**

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाऊन तुम्ही अंग स्वच्छ कराल, पण अंतकरण स्वच्छ करणारे साबण आहे का? पाणी स्वच्छ नसेल तर महागडे साबण देखील उपयुक्त ठरणार नाही. अंतकरण स्वच्छ करणारे साबण अजून आलेले नाही. सज्जन लोक हे तीर्थक्षेत्रापेक्षा आणि साबणापेक्षा श्रेष्ठ असतात, असे संत तुकाराम महाराज यांचे विचार आहेत.

कुंभमेळा हा भटांचा पर्वणी मेळा असतो, असे संत तुकाराम महाराजांचे परखड मत होते. कुंभमेळ्याला जाऊन आंघोळ करणं, केस कापणे, यात कसला आलाय धर्म? हा तर मूर्खांचा बाजार आहे. असे क्रांतिकारक आणि परखड मत तुकाराम महाराजांनी एका अभंगात द्वारे व्यक्त केले आहे

**आली सिंहस्थ पर्वणी।**
**न्हाव्या भटा झाली धनी।।**
**अंतरी पापाची कोडी।वरी वरी बोडी दाढी।।**
**बोडीले ते निघाले । नाही पालटले अवगुण।। पाप गेल्याची काय खूण।**
**तुका म्हणे अवघा सीन।।** अशा

क्रांतिकारक संत तुकाराम महाराजांचा शेवट कसा झाला, याबद्दल मतभिन्नता आहे. ती मतभिन्नता आपण पाहू. संत तुकाराम महाराज यांचा जन्म 1608 चा तर मृत्यू 1650 सालचा, म्हणजे ते फक्त 42 वर्षे जगले. ते वयाच्या 42 व्या वर्षी मृत्यू पावले. हे वय मृत्यूचे नाही. संत तुकाराम महाराज अत्यंत तरुण असताना त्यांचा मृत्यू कसा झाला हा नेहमीच शंकेचा,वादाचा विषय राहिला आहे.

संत तुकाराम महाराजांचा मृत्यू कसा झाला हे समजून घेण्यासाठी त्यांचा संघर्ष समजून घ्यावा लागेल. ते अत्यंत बुद्धिमान,प्रेमळ आणि श्रीमंत होते. त्यांनी सुमारे 5 हजार अभंग लिहिले. त्यांनी लोकांना कर्जमुक्त केले. संत तुकाराम महाराजांचा लढा विषमतेविरुद्ध होता.ते म्हणतात

**भेदाभेद भ्रम अमंगल।   सर्वांची एकची वीण। तेथे कैसे भिन्नाभिन्न।**

भेदभाव बाळगणे अमंगल आहे, तर समता बाळगणे मंगलमय आहे. सर्व माणसं समान आहेत. असे सांगून संत तुकाराम महाराजानी विषमतेला विरोध करून समतेचा आग्रह धरला. वर्णव्यवस्थेवर हल्ला करताना संत तुकाराम महाराज म्हणतात.

**वर्णाभिमाणे।  कोण झाले पावन।।**
**ऐसें द्या सांगून।मजलागी।।**

संत तुकाराम महाराजानी वर्णव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. त्यामुळे जे वर्णव्यवस्थेचे समर्थक होते, ते तुकाराम महाराजावर प्रचंड चिडले. कारण वर्णव्यवस्था हे ऐतखाऊ लोकांचे दुसऱ्याच्या श्रमावर जगण्याचे भांडवल होते.

संत तुकाराम महाराजानी अंधश्रद्धेवर कडाडून हल्ला केला.

**नवसे कन्यापुत्र होती।मग का करणे लागे पती।** नवस सायास करू नका, प्रयत्नानेच यश मिळेल.  **असाध्य ते साध्य।करिता सायास। कारण अभ्यास।तुका म्हणे।**

प्रयत्नवादी व्हा, दैवावर विश्वास ठेवू नका, प्रयत्न केल्याने अशक्य काम शक्य होते, हा संदेश संत तुकाराम महाराजानी दिला. सनातन्यांचा व आपला धर्म एक नाही, त्यामुळे त्यांचा संबंध तोडा, त्यांच्याकडून कोणतेही विधी करू नका,असा मोलाचा उपदेश संत तुकाराम महाराजानी केला.

**अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड।**
**काय त्यासी रांड प्रसवली।।**
**तुका म्हणे ऐसें लंड।**
**त्याचे हाणोनि फोडा तोंड।।क्रमशः**

# परमिट बियर बार, हॉटेल्सवरील ५ टक्के व्हॅट हटवला तरच व्यवसाय ऊर्जितावस्थेत

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश भोंगळ**

**कोळपेवाडी :** हॉटेल्समध्ये मद्य विक्रेत्यांना एमआरपीवरती 7 ते 12 टक्के मार्जिन पूर्वीपासून चालू आहे त्यात वाढ होणे गरजेचे असतांना महसुली तोटा भरुन काढण्यासाठी शासन व्हॅट मध्ये दहा ते पंधरा टक्के वाढ करण्याच्या विचाराधीन असल्याने परमिट रुम बियर बार हॉटेल्स पुर्णपणे बंद पडतिल हि चिंता व्यवसायिकांना सतावत असुन या व्यवसायाला ऊर्जित अवस्थेत आणन्यासाठि व्हॅट हटाव ची मागणी पुढे येत आहे.

परमिट रुम बियर बार हॉटेल्स अनुज्ञप्ती च्या वार्षिक फी मालमत्ता कर लाईट बिला मध्ये दरवर्षी वाढ होत असुन व्यवसायातील ताळेबंद जुळवताना व्यवसायिक हतबल होत असुन महाराष्ट्र शासन मद्यविक्री मध्ये रेट ऑफ मर्जिन वाढवण्या ऐवजी व्हॅट मध्ये दहा ते पंधरा टक्के वाढ करुन परमिट रुम बियर बार हॉटेल्स वरिल निर्णयामुळे बंद पडुन अवैध मद्यविक्री वाढेल असा व्यवसायातील जानकराचा कयास आहे. थ्री स्टार पेक्षा कमी दर्जाच्या रेस्टॉरंट आणि हॉटेल्स मध्ये २०११ पासुन व्हॅट च्या करात कुठलीही वाढ नसल्याने शासन व्हॅट कर पंचतारांकित हॉटेल्स प्रमाणे वाढवण्याच्या विचाराधिन आहे. उत्पादन शुल्क विभागाच्या म्हणण्यानुसार दरवर्षी किमान ७०० कोटी कर संकलन होणे अपेक्षित असतांना कराच्या चोरीमुळे ते निम्यानेच होत. असल्याचे खापर वरिल व्यवसायिकांवर फोडुन पडद्याआडुन उत्पादन शुल्क उच्च स्तरिय अधिकारी शासनास उल्ट्या पाढ्याचा कित्ता वारंवार गिरवतांना दिसुन येतात या मागील भावणा हि नेहमीच अवैध व्यवसायांना उत्तेजन देणारी असते. मद्याच्या होणार्या भाव वाढीचा फटका नेहमी सर्वसामान्य श्रमजिवी वर्गावर लोकाश्रय नसल्याने होत असून देखील जन सामान्य नागरिक या विरोधात रस्त्यावर कधीही उतरला नाही याची शासनास पुर्ण पणे जाणिव असल्याने महसुलात वाढ करण्याची पहिली पसंती मद्यार्क विक्री वरिल कर वाढीवर असते. परमिट रुम बियर बार हॉटेल्स वरील पाच टक्के व्हॅट कर हटवुन तो मद्यार्क निर्मिती (फस्ट पॉईन्ट) कडे नेण्याची मागणी परमिट बार रेस्टॉरंट हॉटेल्स मालक लीकर्स वाईन असोसिएशन कडुन वारंवार




होत असते. या सुधारित कर रचनेमुळे वाईन शॉंप व परमिट रुम मधुन विक्री होणाऱ्या मद्यार्का च्या किंमती मध्ये समानता येवुन अवैध दारु विक्री मध्ये घट होवुन महाराष्ट्र राज्यातील आठरा हजार अनुप्ती धारका कडुन किमान ४२ हजार करोड रुपये शासनास जमा होतील असा वरिष्ठ स्तरांचा अंदाज आहे मार्च अखेर शासनास सोळा हजार ऐकशे बाविस कोटी महसुली उत्पन्न उत्पादन शुल्का पोटी प्राप्त झाले होते त्यात ९० मद्यार्क उत्पादकाचा वाटा बारा हजार कोटी चा आहे. परमिट बियर बार हॉटेल्स व वाईन शॉंप यांच्या मधिल असमान कर रचने मुळे मद्यपीना एम आर पी च्या दरात वाईन शॉंप मधून मद्य मिळत असल्याने त्यांची पहिली पंसत वाईन शॉंप ला असल्या कारणांमुळे सदर व्यवसाय शेवटची घटका मोजत असुन त्यांच्या मद्यार्क विक्री वरिल पाच टक्के व्हॅट हटवुन त्यांना एफ एल सेकंड सिएल थ्री लायसन्स प्रकारात सामावून घेतल्यास शेवटची घटका मोजणारा व्यवसाय उर्जित अवस्थेत येवून हॉटेल्स ढाबे यातुन होणाऱ्या वीनापरवाना मद्यविक्री ला आपसूकच आळा बसेल असे व्यवसायातील जानकारांचे म्हणने आहे. महाराष्ट्र शासनाने १९७३ पासुन किरकोळ देशी दारू (सि एल थ्री) लायसन्स प्रकाराचे चे वाटप केले नसल्याने आज गावोगावी चहा च्या टपरी वर ७० रुपये एम आर पी असणारी देशी दारू १०० रुपये दराने २४ तास उपलब्ध असते .त्यांना नाही परवाना लागततो कि कुठली फि ? व्हॅट मध्ये वाढ करण्याच्या निर्णयला परमिट बार रेस्टॉरंट हॉटेल्स मालक लीकर्स वाईन असोसिएशन व मद्यपान करणाऱ्या व्यक्ती चा प्रखर विरोध आहे.



# समर्थनगर जिल्हा परिषद शाळेत एक मूल, एक झाड उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** नळणी केंद्रातील समर्थनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने गेब्ज फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून एक मूल, एक झाड हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाचे मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला. समर्थनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस गेब्ज संस्थेच्या वतीने 50 रोपे मिळाली होती. शाळेच्या आवारात एक मूल,एक झाड या संकल्पने प्रमाणे प्रत्येक मुलास एक झाड लावण्यास देऊन त्या झाडांना मुलांची नावे देण्यात आली.यामुळे मुलांमध्ये वृक्षाबद्दल प्रेम व आपुलकी निर्माण होऊन झाडे वाढीस लावण्याची भावना निर्माण होत असल्याचे शाळेतील शिक्षकांनी सांगितले. दुपारच्या सुट्टीत जेवणाआधी आणि नंतर मुलं झाडाच्या बुंध्याशी हात धुवून झाडे वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. मुलांच्या या कृतीचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.मुलांना स्वतःचे हक्काचे झाड मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे.आपले झाड वाढीस लागावे म्हणून विद्यार्थी प्रयत्न करत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक विधायक स्पर्धा निर्माण झाली आहे.

आपले झाड वाढीस लागावे म्हणून विद्यार्थी झाडांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. शाळेतील शिक्षही मुलांना प्रोत्साहन देऊन वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून देत आहे. गेब्ज संस्थेच्या माध्यमातून बरंजळा साबळे व नळणी केंद्रातील 31 शाळांना सहा हजार रोपांचे वाटप करण्यात आले आहे. सामाजिक कार्यकर्ते रवींद्र गोरेल यांनी झाडांसाठी मोफत ड्रीप देण्याचे कबूल केले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक आप्पासाहेब साबळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, संस्थेचे प्रतिनिधी दिपक ओढेकर,पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# भूमिपुत्र संघटनेच्या तक्रारीची दखल; अखेर अन्नपुरवठा विभागात कर्मचारी हजार

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या आदेशाने युवक राज्य उपाध्यक्ष केशव गरकळ यांनी अन्नपुरवठा विभागात कर्मचारी हजर राहत नसल्याने सर्वसामान्य जनतेची कामे खोळंबत होती. त्यामुळे रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना 15 सप्टेंबर 2023 रोज शुक्रवारला निवेदन देऊन अन्नपुरवठा विभागात कर्मचारी हजर करा. अन्यथा भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा युवक राज्य उपाध्यक्ष केशव गरकळ यांनी निवेदनातून दिला होता. रिसोडच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन अन्नपुरवठा विभागात ऑफलाइन ऑनलाईन अशा दोन्ही प्रकारच्या कामकाजात रिसोडच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या निवेदनाची तत्काळ दखल घेतली. त्यामुळे अन्नपुरवठा विभागात ऑफलाइन ऑनलाईन अशा दोन्ही प्रकारच्या कामकाजामध्ये पारदर्शकता आली आहे. अन्नपुरवठा विभागातील सर्व कर्मचारी वेळेत सर्वसामान्य जनतेचे काम करीत आहेत. असल्याचे सांगितले व त्या प्रकारचे पत्र सुद्धा दिले असल्याचे युवक राज्य उपाध्यक्ष केशव गरकळ यांनी सांगितले. अन्नपुरवठा विभागात कर्मचारी हजर राहत असल्याचे पत्र प्राप्त होताच भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे युवक राज्य उपाध्यक्ष केशव गरकळ यांनी प्रत्यक्ष अन्नपुरवठा विभागात कर्मचारी हजर राहत असल्याचे पत्र प्राप्त होताच, भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे युवक राज्य उपाध्यक्ष केशव गरकळ यांनी प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी अन्नपुरवठा विभागात दाखल होऊन संबंधित विभागातील कामकाज सुरळीत असल्यामुळे समाधान व्यक्त केले.रिसोडच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या निवेदनाची तात्काळ दखल घेतल्यामुळे भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे युवक राज्य उपाध्यक्ष गरकळ, तालुका उपाध्यक्ष जालिंदर देवकर यांच्यासह भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या निवेदनाची दखल घेतल्यामुळे ठिय्या आंदोलन स्थगित करण्यात येत असल्याचे युवक राज्य उपाध्यक्ष केशव गरकळ यांनी सांगितले.यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





# अहिरे परिसरात पावसाचा धुमाकूळ; बळीराजा सुखावला

आधुनिक केसरी न्यूज

**खंडाळा :** खंडाळा तालुक्यासह अहिरे शिवारात मुसळधार पावसाने हाहाकार उडाला आहे.अनेक गावातील रस्ते जलमय झाले. रस्त्यावरून धो-धो पाणी वाहत आहे.अनेक गटारं तुडुंब भरून वाहत आहेत. दुपारी खंडाळा तालुक्याच्या ग्रामीण भागात भर दिवसा जोरदार पाऊस बरसला. त्यामुळे काही काळ खंडाळा तालुक्याच्या ग्रामीण भागातीलही जनजीवन विस्कळीत झाले.खंडाळा - लोणंद - शिरवळ एमआयडीसी परिसरात देखील पाऊस पडला. खंडाळा-लोणंद रस्त्यावरून प्रवास करताना दुचाकी वाहनधारकांना पावसाचा सामना करावा लागला.वाहनधारक पावसात ओले चिंब भिजले. तालुक्याच्या ग्रामीण भागात बाजरी, सोयाबीन,कडधान्य ही पिके पावसाची वाट पाहून व्याकुळ झाली होती,काहींनी तर माना टाकल्या होत्या.अनेक शेतामध्ये सरीसह वाफ्यामध्ये जोरदार पावसामुळे पाणी साठले,परिणामी बळीराजाला दिलासा मिळाला. खंडाळा-लोणंद रस्त्यावर असणाऱ्या औद्योगिक क्षेत्रातील अहिरे परिसरात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली.त्यामुळे कंपनीत कामाला जाणाऱ्या अनेक कामगारांनी देखील पावसाचा मनमुराद आनंद घेतला.

# चंद्रपूर जिल्हा 'गॅझेटिअर'मधून महत्त्वाच्या नोंदी वगळल्या

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ५० वर्षांनंतर चंद्रपूर जिल्ह्याचे मराठीमध्ये 'गॅझेटीअर' तयार होत आहे. मात्र, या 'गॅझेटीअर'वर भूगोल अभ्यासक प्रा. डॉ. योगेश दुधपचारे, खगोल अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे, प्रा. डॉ. सचिन वझलवार यांनी आक्षेप घेत त्यातून जिल्ह्यातील समाजसुधारक, इतिहास संशोधक, पर्यावरण, साहित्य, सामाजिक, राजकीय व पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गजांची नावे वगळल्याचे म्हटले आहे. सोबतच जिल्ह्यातील अनेक महत्त्वाच्या नोंदींचाही यात समावेश नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. दरम्यान, आक्षेप घेण्याच्या २४ सप्टेंबर या शेवटच्या दिवसापर्यंत केवळ १२ जणांनीच आक्षेप नोंदवले आहेत.

जिल्ह्याचे १९०८, १९७२ नंतर तिसरे 'गॅझेटीअर' मराठीमध्ये तयार करण्यात आले आहे. हे 'गॅझेटीअर' जिल्हाधिकारी कार्यालयात प्रकाशित करण्यात आले असून त्यावर आक्षेप व हरकती मागवण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्रा. डॉ. दुधपचारे, खगोल अभ्यासक प्रा. चोपणे, प्रा. डॉ. वझलवार यांनी आक्षेप नोंदवले. 'गॅझेटीअर'मध्ये जातींची पुरेशी माहिती नाही. साहित्य क्षेत्रातील लहानात-लहान व्यक्तींची नोंद घेण्यात आली आहे. मात्र, इतिहास संशोधक अ.ज. राजूरकर, टी.टी. जुलमे, दत्ताजी तन्नीरवार यांच्यावर केवळ दोन ओळीच आहेत. तसेच वन्यजीव व पर्यावरण क्षेत्रातील बंडू धोतरे यांच्यासह इतरांची नावे वगळण्यात आली आहेत. नागपूर येथे स्वातंत्र्य चळवळीत मॉरिस कॉलेजवर ध्वज फडकवणारे ॲड. राजेश्वरराव हुड यांच्या नावाचाही समावेश नाही. न्यायमूर्ती हिरपूरकर, स्व. शांताराम पोटदुखे, ॲड. पारोमिता गोस्वामी, माजी आमदार स्व. ॲड. एकनाथराव साळवे, मोरेश्वर टेमुर्डे, आजी आमदार वामनराव चटप, माजी आमदार प्रभाकर मामुलकर, स्व. शंकरराव देशमुख यांच्याही नावाची 'गॅझेटीअर'मध्ये नोंद नाही. 'गॅझेटीअर'मध्ये जिल्ह्यातील या महानुभावांची तसेच प्रमुख मंदिरे, मशिदी, चर्च, गुरुद्वारे, राजवाडे, किल्ले यांचीही नोंद घेण्यात यावी. इरई नदी व झरपट नदीची सविस्तर माहिती देण्यात यावी, जिल्ह्याचे सरासरी तापमान, स्वातंत्र्य सेनानी, गोवा मुक्ती संग्राम सेनानी, राजुरा मुक्ती संग्राम सेनानी, स्वतंत्रता सेनानी, वीर बाबुराव शेडमाके यांच्या नोंदी नाहीत. शास्त्रज्ञ, संशोधक, वैज्ञानिकांची माहिती, जिल्ह्यातील सर्वांत जुनी ब्रिटिशकालीन ज्युबिली शाळेची माहितीचा यात समावेश नाही.

# रानडुकरांचा धुमाकूळ; कपाशी पिकांचे नुकसान

## नुकसान झालेल्या पिकांची भरपाई द्यावी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील शेतकऱ्यांचे कपाशी, सोयाबीन व मका पिंकाचे जंगली रानडुक्कर व निलगाई कडून मोठ्या प्रमाणात नुकसान करत या सर्व शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देऊन यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी अ.भ.भ्रष्टाचार संघर्ष समितीचे मराठवाडा विभागीय सरचिटनीस छत्रपती संभाजीनगर यांनी अजिंठा वनपरिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सावळदबारा येथील रहिवासी अल्पभूधारक शेतकरी फकीरा गुलाब तडवी गट नंबर ५१ क्षेत्र एक हेक्टर शिवार सावळदबारा या शिवारात रानडुकराकडून कपाशी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. रानडुकराचा बंदोबस्त करून नुकसान भरपाई देण्यात यावी.सावळदबारा शिवारात शेतकर्यांनी शेतात सध्या कापूस, तूर, सोयाबीन आदी पीक लागवड केली आहेत. सध्या शेतकरी निसर्गाच्या लहारीपणामुळे त्रस्त असतांना रानडुकराने पिकांची नासाडी करण्यास सुरुवात करीत नुकसान केल्या जात पिकांची नुकसान होत असल्याने येथील सर्व शेतकरी त्रस्त होत आहे. अजिंठा वनीकरण विभागाने वन्य प्राण्याचा बंदोबस्त करून नुकसान भरपाई देण्याची मागणी गोकुळसिंग राजपूत व शेतकरी फकीरा गुलाब तडवी यांनी केली आहे.सावळदबारा शिवारात दोन एक हेक्टर कपाशी पिकाची लागवड केलेली आहे.या परिसरात निलगाई व रानडुक्कर यांचे कळपच असतात रानडुकराकडून ८० आर कपाशी पिकाची नासाडी करून नुकसान केले आहे. तसेच मका व कपाशी लागवड



केलेली आहे. तिथे रानडुकर लहान झाडांचे बोड खावून नुकसान करीत आहे. याकडे अजिंठा वनीकरण विभागाने लक्ष देऊन नुकसान भरपाई तत्काळ द्यावी- या जंगली जनावरे यांचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे मराठवाडा विभागीय सरचिटनीस तथा उपसंपादक गोकुळसिंग राजपूत व शेतकरी फकीरा गुलाब तडवी यांनी वनपरिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांच्या कडे केली आहे.

# शेतमजुरांना विमानातून घडवले बालाजी दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** शिरोळ येथील प्रगतशील शेतकऱ्यांने याच दातृत्वाचा दाखला देत आपल्या शेतात राबणाऱ्या शेतमजुरांना विमान, रेल्वेचा प्रवास करून तिरुपती बालाजीचे दर्शन घडवले आहे. हे अनोखे पर्यटन पाहून श्रमिकांचे चेहरे आनंदाने उजळले गेले. श्रीमंती तर अनेकांकडे असते. पैश्याबरोबरच माणसं, मान कमावतो ती खरी मनाची श्रीमंती ! अशा श्रीमंत माणुसकीचे दर्शन शेखर पाटील यांनी घडवले आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा. हिरवीगार शेती पिकाची यासाठी त्याचे प्रयत्न असतात. काळ्या मातीतील या प्रयत्नांना खरी साथ मिळते ती अहोरात्र राबणाऱ्या शेतमजुरांची. अशा या गरीब शेतमजुरांनाही आनंदाचे चार क्षण मिळावेत यासाठी सैनिक टाकळी येथील प्रगतशील शेतकरी शेखर सदाशिव पाटील यांनी एक अनोखा उपक्रम राबवला.त्यांच्याकडे गेली अनेक वर्ष काम करणाऱ्या २५ शेतमजुरांना त्यांनी तीर्थक्षेत्रांना भेटी देणारी सहल आयोजित केली. शिरोळ येथील प्राथमिक शिक्षिका श्रीमती सुनंदा चंद्रकांत पाटील यांनी शेखर पाटील यांना शेतमजुरांना विमानाने बालाजी दर्शन घडवून आणण्याची संकल्पना कथन केली. स्वतःही शेतमजुरांसोबत येण्याची तयारी त्यांनी दर्शवली. ही भूमिका शिरोधार्य मानत शेखर पाटील यांनी सहकुटुंब शेतमजूर व त्यांचे मुले यांच्यासोबत प्रवास करण्याचे निश्चित केले. ही सर्व मंडळी बेळगाव येथील विमान तळावरून तिरुपती बालाजीची हवाई यात्रा घडवली.

# सोयगाव तालुक्यात यावर्षीचा गणेशोत्सव गुलाल व डीजेमुक्त करावा : उत्तम चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात शहरात व गावात यावर्षी दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने लाडक्या बाप्पाचे स्वागत आणि निरोप देताना गुलालाची उधळण केली जाते. याच गुलालात कचखडीचे बारीक कण व केमिकल असतात ते कान, डोळे, नाक, तोंडात गेल्यावर घातक ठरु शकतो, शिवाय याच गुलालामुळे दोन समाजात तेढही निर्माण होऊ शकतात हे सर्व टाळण्यासाठी सोयगाव तालुक्यातील, परिसरातील गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या गणरायालानिरोप देताना गुलालाऐवजी फुले किंवा फुलांच्या पाकळ्या उधाळाव्यात असे आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्हाचे सरचिटणीस उत्तम चव्हाण यांनी केले आहे. कोरोना नंतर यंदाच्या गणेश उत्सवार दुष्काळाचे सावट आले आसून यावर्षी दुष्काळजन्य परिस्थिती असली तरी गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे आनंदात आणि जल्लोषात स्वागत केले. मात्र आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देताना सोयगाव, सावळदबारा व देव्हारी गावातील गणेश भक्तांनी गुलाला ऐवजी फुले उधळून आपल्या लाडक्या गणरायाला निरोप द्यावा तसेच मिरवणुकीत डीजे वाद्ये गणेश मंडळाने यावर्षीचा आणि गुलालमुक्त करावा पारंपरिक वाद्ये वाजवावेत विसर्जन मिरवणुकीत विघ्नसंतोषी लोकांन पासून सावध रहावे कसल्याही अफवांवर विश्वास न ठेवता मिरवणूक शांततेत पार पाडावी यासाठी सोयगाव तालुक्यातील पोलिस प्रशासनाला सहकार्य करून गणेशोत्सव डीजेमुक्त करावे आशे आवाहन छत्रपती संभाजीनगर भाजापाचे सरचिटणीस माजी सरपंच उत्तम चव्हाण देव्हारी ता सोयगाव यांनी केले आहे.

# देवळगाव गुजरीत शेतकऱ्याचे झटका मशीन, बॅटरी व स्टार्टर चोरी

## पहूर पोलिसात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील देवळगाव गुजरी येथील शेतकरी सुभाष गणेश तेली शिवार देवळगाव गुजरी यांच्या शेतातून अज्ञात चोरट्यांने रात्रीचा अंधाराचा फायदा घेऊन शेत जमिनीतील गट नंबर १६८(३४) शेतातून अज्ञात चोरट्यांने चोरुन नेले आहे याबाबत सुभाष गणेश तेली देवळगाव गुजरी यांनी फत्तेपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करुन अज्ञात चोरटा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मी

माझ्या शेतात रानडुक्कर व निलगाई या जंगली जनावरांपासून मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते म्हणून आपल्या शेतातील पीक वन्यजीवापासून वाचत आहोत तसेच पशुपालकांचा वापर करून बाजाराला झटका देणारी मशीन कंपनी वापरत होतो.परिसरात शेतकरी आपल्या शेतमालाचे तारे वापरत आहे. त्या शेतकऱ्याला फायदा होतो कारण त्या तारेतून जनावरांचे नुकसान होत होते. शेतकरी मोठ्या कष्टकरी शेतीमध्ये बिघाड करून. तो आर्थिक अडचणीत सापडतो.

जंगलातील शेतात आढळून आलेले शेतजमिनी पिकांना नुकसान पोहोचवतात आणि यातून मिळणाऱ्या शेतमालाच्या पिकांना वाचण्यासाठी शेतकरी आपल्या शेतजमिनीची जागा मिळवून देतात. आणि २४ तास शेतातील पिकांची राखण करणे शक्य होत नाही. आपल्या शेतीतील पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांचा पर्याय म्हणून झटका मशीन वापरत होतो यापासून जनावरांना काही होत नाही तार बघून ते शेतात येत नाही फक्त एक धाक म्हणून आम्ही वापरत होतो परंतु दि.२३/९/२३ रोजी दुपारी तीन वाजता शेतात गेलो असता चोरट्याने झटका मशीन, बॅटरीक व स्टार्टर चोरुन नेल्याचे मला आढळून आले मी तात्काळ फत्तेपूर पोलिस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली आहे.

भटकी गुरे, गायी, नीलगाय किंवा रानडुकरे शेतात घुसून पिकांची नासाडी करत असल्याने देशभरातील शेतकरी त्रस्त आहेत. कडाक्याची थंडी असो वा कडक दुपार, शेतकरी शेतात थांबून पहारा देतात. मात्र त्यानंतरही संधी मिळताच जनावरे त्यांच्या पिकांना नष्ट करतात. यामुळे शेतकऱ्यांच्या या समस्येवर मात करण्यासाठी कृषी शास्त्रज्ञांनी झटका मशिन तयार केले आहे, ज्यामुळे जनावरांना इजा न होता पीक सुरक्षित ठेवता येते म्हणून बरेच शेतकरी यांचा वापर करावा लागतोण्



# लामणगाव जि.प. शाळेची दुरवस्था व नवीन शाळाखोल्या कामाची मनसेकडून पोलखोल

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे लामणगाव दुरक्षेत्र डोंगराळ भागात जिल्हा परिषद शाळेची दुरावस्था असुण व नव्याने होत असलेल्या शाळा निकृष्ट दर्जा कामाची मनसे विद्यार्थी सेने कडून पोलखोल करण्यात आली असून प्रकरण वरिष्ठांकडे दाखल करण्यात आले आहे. लामणगाव ता. खुलताबाद येथे जिल्हा परिषद शाळा असुण शाळा उंच डोंगरालगत आहे. तर या शाळेत विद्यार्थ्यांची गैरसोय आहे.शैचालयाला रस्ता नाही.डोंगरातून दरड केंव्हा कोसळेल याचा काही नेम नाही. जीवमुठीत धरुन विद्यार्थी शिक्षक येथे जगत आहे.तर येथेच नवीन शाळांचे बांधकाम सुरू असुण काम अतिशय निकृष्ट व दर्जाहिन होत असताना कुणाचेच लक्ष नाही.सरकार लाखो रुपये खर्च करून सोयीसुविधा उपलब्ध करत असताना प्रशासनाला धरुन काम गुत्तेदार निकृष्ट दर्जाचे कामे करुन निधी लाटण्याचा प्रयत्न सुरु आहे.याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना विद्यार्थी तालुका सेनेचे जिसं अशोक पवार,ताअ.मुकेश मालोदे,उअ.अनिल भागडे,तास.गोरख चव्हाण, अशोक पवार,अशोक कराळे, संतोष काळे, चैतन्य नागे,योगेश मालोदे, चैतन्य खुंचे, साहेबराव पवार,अशोक पवार आदी कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर जावून शाळेची दुरावस्था व निकृष्ट दर्जाचे कामाची पोलखोल केली व जिप सिओ,शिक्षण उपसंचालक,गट शिक्षणाधिकारी यांच्या कडे निवेदन देत तातडीने शाळा व शाळा कामाची चौकशी करून उपाययोजना करावे नसता मनसे स्टाईल ने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# फुलंब्री तालुक्यातील तरुण शेतकऱ्याने कर्जाला कंटाळून केली आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील शिरोडी"बुद्रुक" एका तरुण शेतकऱ्याने आपल्या शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुःखद घटना सोमवारी (ताः२५) दुपारी घडली परिसरातील शिरोडी"बुद्रुक"तालुका फुलंब्री येथील योगेश भगवान भागवत वय (३६) वर्ष असे त्या शेतकऱ्याचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार शिरोडी बुद्रुक शिवारातील गट क्रमांक 209 मधील शेतात काम करण्यासाठी ते गेले असताना दुपारी चारच्या दरम्यान स्वतःच्या विहिरीत त्यांनी उडी घेतली त्यांना तीन एकर शेती असून ते स्वतः कसत त्यांच्या पत्नी देखील शेतात होत्या त्यांनी दृश्य पाहिल्यावर आरडा ओरड केली जवळच असणाऱ्या शेतकरी शेख निहाल नंदू भागवत शरद भागवत आप्पाराव भागवत व गोकुळ खंडागळे हे मदतीसाठी धावून आले त्यांनी त्यांना विहिरीतील पाण्यातून बाहेर काढले व बाजार सावंगी पोलीस चौकी त त्यांनी माहिती दिली. पोलिसांनी बाजार सावंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील दवाखान्यात उपचारासाठी आणण्याचे सांगितले. वैद्यकीय अधिकारी डॉः अंजुमन निलोफर यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले यावरून सव्वा पाच वाजता जमादार दिलीप बनसोड संजय सपकाळ प्रकाश ठोकळ व संजय पुंड यांनी अधिकृत पंचनामा केला. साडेपाचला डॉक्टरांनी छवविच्छेदन केले नंतर मृतदेह नातेवाईक व आप्त यांच्या ताब्यात घेऊन स्वतःच्या गावी अंत्यसंस्कारासाठी देण्यात आला. पंधरा दिवसापासून ते नाराजीत वावरत असल्याचे सांगण्यात आले त्यांच्यावर एका राष्ट्रीयकृत बँकेचे पिक कर्ज असून ते भरणे गरजेचे होते यावर्षी पावसाने ओढ दिल्याने हंगाम देखील चांगला नाही त्यामुळे ते नाराजच असायचे असे भाऊ-बंदांनी सांगितले. त्यांच्या पश्चात पत्नी सरला भागवत व एक मुलगा भावेश भागवत विधवा भावजई व त्यांची मुले असा परिवार आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद




# जवळ्यात 'स्वच्छता हीच सेवा' कार्यक्रम उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकिय कार्यालय व परिसर स्वच्छता कार्यक्रमांचे आयोजन करुन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्ह्यात १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या कालावधीत "स्वच्छता ही सेवा" उपक्रम राबविण्यात येत आहेत. या कालावधीमध्ये सुरु असणाऱ्या दैंनदिन उपक्रमांना गती देण्याकरिता ग्रामीण भागात स्वच्छतेसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा योग्य सन्मान करण्यासाठी, स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सामाजिक दृष्टीकोन बदलण्यासाठी आणि त्यांच्या कामापासून अनेकांनी स्वच्छतेची प्रेरणा घेण्यासाठी विविध उपक्रम तसेच सर्व शासकिय कार्यालयात "स्वच्छता ही सेवा" उपक्रम राबविला जात आहे. या अंतर्गत जवळा देशमुख येथे ग्रामपंचायत कार्यालय आणि जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत स्वच्छता हीच सेवा हा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, ग्रामपंचायत कार्यालय जवळाचे सरपंच कमलताई शिखरे तसेच ग्रामसेवक गजानन कोंडामंगले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आणि नागरिकांनी सहभाग नोंदविला. हातात खराटे घेऊन शाळा व शाळा परिसर, ग्रामपंचायत परिसर, कीचनशेड, वॉटरप्लांट तसेच परसबागेतची आणि पाण्याच्या स्त्रोतांजवळ स्वच्छता करण्यात आली. यावेळी साहेबराव पाटील शिखरे, पांडूरंग गच्चे, शिक्षक नेते संतोष अंबुलगेकर, सहशिक्षक संतोष घटकार, मारोती चक्रधर, पवन गोडबोले, भगवान गोडबोले, सूनील शिखरे, आनंद गोडबोले, हैदर शेख, मनिषा गच्चे, वैभवी शिखरे, कृष्णा शिखरे, योगेश मठपती, कल्याणी शिखरे, अक्षरा शिंदे, रितेश गवारे, गीतांजली गोडबोले, दीपाली गोडबोले, अनुष्का झिंझाडे, निशा गोडबोले, किरण कदम, कावेरी गच्चे यांनी सहभाग घेतला होता.




# संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान तत्काळ देण्यात यावे : समीर केने

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान जून महिन्यापासून थकीत आहे ते अद्याप लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाले नसून गोरगरीब, वृद्ध, अपंग, निराधारांचे देय असलेलं अनुदान तात्काळ देण्यात यावं अशी मागणी संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष समीर केने यांच्या नेतृत्वात सर्व समिती सदस्यांनी केली आहे. सदर अनुदान हे एकूणच महाराष्ट्राच्या लाभार्थ्यांचे थकीत असल्याची माहिती आहे अशात महाराष्ट्रातील लक्षावधी लाभार्थ्यांना अद्यापही अनुदान मिळालं नसल्याने सर्व लाभार्थ्यांची गैरसोय होत असून यावर शासनाने गंभीरतेने लक्ष घालून तात्काळ देय असलेली रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली . याप्रकरणी जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांना लाभार्थ्यांना अनुदान न मिळाल्याची माहिती देण्यात आली विषयाची गंभीरता लक्षात घेऊन त्यांनी संबंधित खात्याच्या मंत्रालयात सूचना केल्या असून सदर अनुदान लवकरात लवकर लाभार्थ्यांना मिळेल याबाबत आश्वस्त केले आहे. संजय गांधी निराधार योजना समितीच्या वतीने तहसीलदार डॉ. कांचन जगताप यांच्या मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी भाजपचे महामंत्री मनीष पांडे संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य राजेश दासरवार किशोर मोहुरले मल्लेश कोडारी सतीश कनकम श्रीनिवास कंदकुरी उपस्थित होते.

# झाडेगावातील विद्यार्थ्यांचा संताप अनावर; बस थांबण्यासाठी केला रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** हात देवूनही बस थांबत नसल्यामुळे झाडेगावातील विद्यार्थ्यांनी २५ सप्टेंबर रोजी थेट रोडवर येऊन रास्ता रोको करत जळगाव जामोद आगाराचे लक्ष वेधले.

तालुक्यातील झाडेगाव हे जळगाव जामोद नांदुरा रोडवर असून या गावातील अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी जळगाव जामोद येथे शिक्षणासाठी दररोज एस.टी.बसने प्रवास करावा लागतो.पण एस.टी.बस अगोदरच भरून येत असल्याने विद्यार्थ्यांनी हात देवूनही बस चालक बस थांबवत नाही.परिनामी तासनतास विद्यार्थ्यांना बस थांब्यावर एस.टी.बसची वाट पहावी लागते.कधीकधी तर विद्यार्थ्यांना नाईलाजाने खाजगी वाहणाने प्रवास करावा लागतो.त्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो.विद्यार्थी वेळेवर शाळेत, महाविद्यालयात पोहचत नाही.याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर सुद्धा होतो. वास्तविक शासनाने महिलांना सवलतीच्या अल्प दरात प्रवास करण्याची संधी उपलब्ध करून दिली असून ६० वर्षी वरील बुजुर्ग लोकांना सुद्धा एस.टी.बसमद्धे सवलत दिली असल्याने आज रोजी मोठ्या प्रमाणावर लोक एस.टीचा प्रवास करतांना दिसून येतात.त्यामुळे सवलतीच्या दरातीलच प्रवाशांनी एस.टी भरत असून याचा मोठा फटका मात्र झाडेगावच्या विद्यार्थ्यांसह इतरही गावातील विद्यार्थ्यांना बसत आहे.या विद्यार्थ्यांजवळ सुद्धा सवलतीच्या दरातील पासेस असतात तरीसुद्धा त्यांच्यासाठी एस.टी.बस थांबत नाही.त्यामुळे अखेर झाडेगावातील विद्यार्थ्यांनी थेट झाडेगावातील रोडवर येवून रास्तारोको करत वाहतूक अडवली.त्यामुळे वाहणांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे बराच वेळ वाहतूकीची कोंडी झाली होती.दिड तासानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत चालू झाली.जळगाव आगार प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विद्यार्थ्यांनी हे रास्ता रोको आंदोलन केले होते. जळगाव बस डेपोला जळगाव ,नांदुरा व संग्रामपूर तालुकासुद्धा सांभाळावा लागतो त्यामुळे बसेस अपुऱ्या पडत असल्याचे आगार प्रमुखांकडून सांगण्यात आले.





# उरण येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 55 वा राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला. तसेच महाविद्यालयात मेरी माटी मेरा देश उपक्रमांतर्गत अमृत कलशात माती संकलन व स्वच्छता सप्ताह साजरा केला जात आहे.

या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतःचा सर्वांगीण विकास करावा व परिपूर्ण जीवन जगण्यास स्वतःला सक्षम करावे असे सांगितले. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एच.के. जगताप कार्यक्रमात उपस्थित होते त्यांनी मेरी माटी मेरा देश या सरकारच्या उपक्रमाचा उद्देश सांगितला. तर आय.क्यु.ए.सी कॉर्डिनेटर डॉ. ए. आर. चव्हाण यांनी देशाच्या विकासात एनएसएस ची भूमिका व विद्यार्थ्यांचा सहभाग याविषयी विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी योगिनी म्हात्रे (एस.वाय बि.ए) तर आभार कुमारी तनवी चौगुले (एफ.वाय.बि.ए) हिने व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ.डी.पी. हिंगमिरे, डॉ.एम.जी लोणे, अनुपमा कांबळे यांनी केले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# गदाना येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील गदाना येथे मंगळवार दि.२६ रोजी सी.एस.एम.एस.एस कृषी विदयालय, कांचनवाडी व तालुका कृषी अधिकारी, खुलताबाद, यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी मेळाव्याचे आयोजण करण्यात आले होते. दरम्यान यावेळी काकासाहेब अधाने यांनी दीप ज्वलन कऊन कार्यक्रमाचे उदघाटन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ज्ञानेश्वर तारगे, तालुका कृषि अधिकारी यांनी शासनाच्या विविध योजना, पिक विना, पिएमकेल्सवाय थाविषयी सविस्तर मार्गदर्शन डेलो तर मंडळ कृषि अधिकारी काकासाहेब इंगळे यांनी कपशिवर येणा-या वांडअळी रोखण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात याविषयी सविस्तर योगदर्शन केले यावेळी पि.व्ही. घायट1 ,प्रतिभा बोर्ड ,नागरे टस. एस मिनगीरी, डॉ.एस वी सातपुते यांच्यासह गदाणा येथील ग्रामस्थउपस्थित होते.



# सोन्याच्या जेजुरीगडाला मिळणार पुन्हा ऐतिहासिक झळाळी

## अर्थसंकल्पातील मंजुरीमुळे पहिला टप्प्याची कामे वेगाने सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**विजयकुमार हरिश्चंद्रे**

**जेजुरी :** भारतीय लोकदैवत असलेल्या आणि सोन्याची जेजुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खंडोबा मंदिरं गडकोटास सुमारे तीनशे वर्षा पूर्वीच्या स्थापत्य बांधकाम शास्त्राची पुन्हा झळाळी गडाचे गतकालीन वैभव पुन्हा झळकणार ASUNगडकोट भिंती अंतर्गत दगडी कामाला सुरवातही करण्यात आलि आहे. या करिता राज्य शासनाच्या पुरातत्व विभागकडून कामना वेगही आला असून मंदिराच्या गर्भगृहातील काम अंतिम टप्यात आले आहे. तीर्थक्षेत्र जेजुरी करिता सुमारे 349 कोटी 45 लक्ष रुपयांचा निधीही सण 2021,22 च्या अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली असून त्यानुसार जेजुरी गडाच्या पहिल्या टप्प्याचे कामही कार्यवनीत झाले आहें. सुमारे तीनशे वर्षा नंतर एवढ्या मोठ्या निधीच्या माध्यमातून गड मंदिरं आणि परिसराचा जीर्णोद्धार होत असून आपल्या कुलदैवतला पुन्हा जुन्या देखण्या स्वरूपाची झळाळी मिळणार असल्याचे समाधान जेजुरी ग्रामस्थ मानकरी गावकरी खान्देकरी, गुरव पुजारी सेवक कर्मचारी वर्गा सह राज्यातील भविकांनी समाधान व्यक्त केले आहें. या जीर्णोद्धार सह विकास कामाचा शुभारंभ जेजुरीत नुकत्याच झालेल्या शासन आपल्या दारीं कार्यक्रमात राज्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांच्या उपस्तिथ करण्यात आला याकरिता जिल्हाधिकाऱ्यांनी पुरातत्व विभागाच्या अनुमतीने गडावरील विकास कामांची अभ्यास पूर्ण सुरवात केली आहे. सध्या गडाचा प्रथमदर्शनी भाग आतील रंगमहाल, ओवऱ्या दगडी मनोरे यांचे क्लिनींग करण्यात आले असून गडाचे पूर्व वैभव मुलस्वरूपाचे देखणे वैभव हळूहळू दिसू लागले आहें इतिहास कालीन सरदार मल्हारराव होळकर, राजमाता अहिल्यादेवी होळकर, छत्रपती शिवाजी, शहाजी, मालोजीराजे महाराज,भोसले परिवाराच्या काळातील सुंदर देखण्या दीपमाळा गडकोटचा झालेला जीर्णोद्धार तत्कालीन गडमंदिर



गाभारा सौदर्य पुन्हा एकदा उजळून जाणार आसल्याची किमया पुरातत्व विभाग प्रमुख वाहने साहेब तसेच अभ्यासक कारगिर करून घेत आहेत संपूर्ण आराखड्या नुसार संपूर्ण गडपरिसराचा तीन टप्यात करण्यात येणार असून प्रथम टप्पा एक मधून मंदिरं गाभारा पूर्ण तटबंदी जतन आणि दुरुस्ती करण्यात येणार असून याकरिता आकरा कोटी बावीस लाख 96हजार सातशे तेतीस रुपयांची तरतूद केली गेली आहें तर उर्वरित निधीतून मंदिरं गड लगत परिसरातील ऐतिहासिक वास्तू वस्तू तत्कालीन सोयसुविधा असलेला होळकर कालीन तलाव पेशवे कालीन तलाव छोटी मंदिरे जयाद्री डोंगर कडेपठार पायरी मार्ग इत्यादिचा समावेश आहें पुरातत्व विभागाने तंत्र कौशल्य साधने साहित्याचा वापर करीत ऐतिहासिक दगडाना मुलस्वरूप देण्याचा उत्तम प्रयत्न केला आहें या करिता विषष्ठ शैलीच्या दगदचाही वापर करण्यात येत असल्याचे प्रमोद चव्हाण यांनी सांगितले तर या कामाचे समाधानही नवनिर्वचित देवसंस्थान कमिटी अध्यक्ष पोपट खोमणे विश्वस्त डॉ राजेंद्र खेडेकर, मंगेश घोणे, ऍड विश्वास पानसे ऍड पांडुरंग थोरवे, अभिजित देवकाते, आणि अनिल सौन्दडे तसेच गुरव पुजारी कोंळी घडशी वीर समाजाने ग्रामस्थ खान्देकरी मानकरी सेवकरी कर्मचारी वर्गाने समाधान व्यक्त केले आहे.




# नातवाचा पहिला मित्र आजोबा आणि आजोबाचा शेवटचा मित्र नातू असतो

## शिक्षणाधिकारी (प्रा.) प्रा. गणेश शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** बाल विद्यामंदिर परभणी येथील प्राथमिक विभागाच्या वतीने आजी आजोबा दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. विवेक नावंदर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी (प्रा.) प्राध्यापक गणेश शिंदे हे होते. प्रमुख उपस्थिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲडवोकेट विलास पोहंडूळकर, संस्था सदस्य एम. जी. विहिटकर माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य अरुण बोराडे, वैभवनगर विभागाचे उपमुख्याध्यापक रामदास तुमेवार, प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सिंधू शर्मा यांची होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिंधू शर्मा यांनी केले. यामधून त्यांनी आजी आजोबा दिन साजरा करण्याचे महत्त्व विषद करीत त्यांचे संस्कार खूप महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने व चिमुकल्यांच्या सुंदर नृत्याने झाली. यास उपस्थितांनी मनमुराद दाद दिली. याप्रसंगी नातवांच्या हस्ते आजी आजोबांचे औक्षण करण्यात आले. विविध मनोरंजक खेळातून व प्रश्न विचारून आजी-आजोबांचे मनोरंजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण सेल्फी पॉईंट. यावर आजी-आजोबांनी नातवांसह फोटो घेऊन आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी शिक्षणाधिकारी (प्रा.) प्रा. गणेश शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनातून आम्ही आजी आजोबांच्या संस्कारातूनच घडल्याचे सांगत नातवाचा पहिला मित्र आजोबा व आजोबाचा शेवटचा मित्र नातू असतो. असे सांगत कवितेतून आजी आजोबांचे महत्त्व विशद केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात संस्थेचे सचिव डॉ विवेक नावंदर यांनी आजी आजोबा दिन हा विज्ञान दिनापेक्षा ही मोठा आहे. आजी आजोबा म्हणजे संस्काराचे विद्यापीठ ज्ञानाचा झरा असल्याचे सांगत ते कधीही दुरावले जाऊ नयेत ही अपेक्षा व्यक्त केली. तसेच कुटुंबात भावनिक संवाद महत्त्वाचा असून आजी, आजोबा, सून, नातवंडे यांच्या संवादाचा पूल असावा असे सांगत कुटुंबाच्या प्रवाहात असणे सर्व रोगांसाठी उत्तम टॉनिक आहे असे विषद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवंदले यांनी केले. तर आभार प्रदर्शन सौ. जाधव यांनी केले. कार्यक्रमास सिंधु शर्मा (मुख्याध्यापिका) प्रा. अरुण बोराडे (मुख्याध्यापक) आजी-आजोबा पालक विद्यार्थी व शिक्षक वृंदांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंदांचे सहकार्य लाभले.

# युवासेना सचिव वरुण सरदेसाई यांच्या वाढदिवशी शाखा उद्घाटन मोहिमेस प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** युवासेनाप्रमुख सन्माननीय आदित्यसाहेब ठाकरे यांच्या अफाट कर्तृत्वापाठोपाठ युवासेना सचिव मा.वरुणजी सरदेसाई साहेब संघटनेसाठी अथक परिश्रम घेत आहेत. वरुणजी सरदेसाई साहेबांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून युवासेना शाखा फलक अनावरण मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. शहरातील सुप्रसिद्ध गणेश मंडळ असलेल्या शिवनेरी चौकात युवासेना शाखा फलकाचे युवासेनेचे उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव मा.विराजजी कावडीया व युवासेना विस्तारक मा. शंभूजी बागुल यांच्या शुभहस्ते जल्लोषात अनावरण करण्यात आले, येत्या काळात संघटना वाढीसाठी युवासेना धुळे जिल्हा कार्यकारिणी अशाच पद्धतीने शाखा स्थापन करून अधिकाधिक युवा वर्ग युवासेनेसोबत जोडण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे, असे कार्यक्रमाचे आयोजक युवासेना जिल्हा प्रमुख हरीष माळी व युवासेना धुळे उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे यांनी सांगितले. तसेच यावेळी मरिमाता मित्र मंडळ शिवनेरी चौक येथे विराजमान गणपतीची आरती प्रमुख अतिथी मा.विराज कावडीया व मा.शंभूजी बागुल यांचे हस्ते आरती करण्यात आली. यावेळी युवासेना उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव मा.विराजजी कावडीया, शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख शुभांगीताई पाटील, युवासेना विस्तारक शंभु बागुल, युवासेना जिल्हाप्रमुख हरीष माळी, शिवसेना विधानसभा संघटक ललित माळी, नंदुरबार विस्तारक तथा उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे, युवतीसेना जिल्हाप्रमुख सोनीताई सोनार, महानगरप्रमुख सिद्धार्थ करनकाळ, महानगरप्रमुख मनोज जाधव,शिवसेना उपमहानगरप्रमुख कैलास मराठे, विधानसभा क्षेत्र प्रमुख योगेश मराठे, तालुकाप्रमुख गणेश चौधरी, सिद्धेश नाशिककर, प्रितम शिंदे, युवतीसेना साक्री तालुकाप्रमुख कामिनी देसले, जयेश फुलपगारे, शुभम फुलपगारे, मोहित वाघ, रोहित अमृतकर, माज खान, मंडळाचे अध्यक्ष गोपाल चव्हाण, उपाध्यक्ष अमिन शेख, हर्षल साळुंके, उज्वल कोठावदे, जयेश नाईक, संकेत कोठावदे, अथर्व पाटकर, सौरव कुटे, ओम कानकाटे, शंतनू भडागे, स्वप्निल कांत, दुर्वेश चव्हाण, हर्षवर्धन मराठे, ऋषिकेश भडागे, चेतन शिंदे, सोनु पोलादे, अजित शेख, आदी युवासेना पदाधिकारी युवासैनिक, तमाम गणेशभक्त उपस्थित होते.




# लोणी ग्रामपंचायत अंतर्गत ड्रेनेज कामाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे लोणी ग्रामपंचायत अंतर्गत गावात ड्रेनिज लाईन कामाला सुरुवात करण्यात आली. कामाचे सरपंच गुलशन बी सत्तार पटेल यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. आज दि.२६ रोजी ड्रेनेज लाईन संतोषीमाता मंदिर ते श्रीकृष्ण मंदिरापर्यंत( सांडपाणी सुव्यवस्था) चे कामांचे भूमिपूजन ,लोणी गावचे सरपंच गुलशनबी सत्तार पटेल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच पुष्पाबाई दांडेकर, ग्रापं सदस्य मोईन पटेल, कैसर पटेल, संतोष दांडेकर, रुबीना पटेल, बानोबी पटेल, ईंदुबाई गायकवाड, ज्योती वाढेकर, बाळकृष्ण दांडेकर हरीकिसन जाधव, बळीराम दांडेकर, सागर दांडेकर, भाऊसाहेब दांडेकर, युवराज दांडेकर, गणेश दांडेकर (व्हा चेअरमण) कृष्णा बापु, आप्पासाहेब दांडेकर, संजय दांडेकर, दत्ता वाढेकर, लाला दांडेकर, सोमीनाथ दांडेकर, प्रदिप दांडेकर, काकासाहेब आप्पा, कचरु जाधव, सचिन दांडेकर, सिराज भाई ,इद्रिस पटेल, शहारुख पटेल नागरिक उपस्थित होते.



# आईसमोर पोटच्या गोळ्याला विकले

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** तुला तुझ्या नवऱ्याने सोडून दिलं आहे, त्यापासून तुला एक मुलगा देखील आहे. तू एकटे आयुष्य कसं जगणार आम्ही तुझे दुसरे लग्न लावून देतो, असे सांगून कोल्हापूर बेळगाव येथे बसने घेऊन जाऊन २८ वर्षीय महिलेचा एक वर्षाचा मुलगा चक्क आई देखत नराधमाने विकल्याची खळबळ जनक घटना समोर आली आहे. ही घटना बीडच्या माजलगाव तालुक्यातील असून या घटनेनंतर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

माजलगाव जवळच असलेला गोवर्धन पाटी तांडा येथील कोमल श्रीराम चव्हाण (वय २०) या महिलेचा काही वर्षांपूर्वी विवाह झाला होता. मात्र, काही कारणास्तव तिच्या नवऱ्याने तिला सोडलं. याचाच फायदा घेत काही नराधमांनी यात छाया देशमुख (रा. माजलगा), किशोर भोजने (रा. जिगाव तांडा नांदूर. जि. बुलढाणा), ललिता त्याचबरोबर दीपक एक अनोळखी व्यक्ती तर अजून एक अनोळखी व्यक्ती या सहा जणांनी मिळून कोमल चव्हाण यांना तुझा नवरा तुला सांभाळत नाही. पुढचे सगळे आयुष्य तू एकटी कसे काढणार, अशा प्रकारच्या एक ना अनेक गोष्टी तिझ्या डोक्यात भरून तुझे दुसरं लग्न आम्ही लावून देऊ यासाठी तुला आमच्यासोबत यावं लागेल", असे सांगितले. याचबरोबर कोमलही या आमिषाला बळी पडून त्यांच्यासोबत कोल्हापूर बेळगाव येथे गेली. मात्र, तिच्यासोबत असलेला एक वर्षाचा तिचा मुलगा कार्तिक हा तिच्यासोबत घ्यायला सांगितला. बेळगाव राज्य कर्नाटक येथे तिला घेऊन जाताच काही लोकांसोबत या नराधमांची चर्चा तिने ऐकली. तिचा मुलगा ५० हजारांत विक्री करत असताना तिने या गोष्टीला विरोध केला. मात्र, यावर तिची कोणतीही गोष्ट न ऐकता बाळ हिसकावून घेऊन तो विक्री केला आणि तिला तिथेच सोडून या भामट्यांनी पोबारा केला.

# प्रशिक्षित स्वाभिमानी सत्यशोधकांची फौज निर्माण करणार

## विशाल धेंडे :वाकी येथे 'सत्यशोधक संवाद सभा' उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** महापुरुषांच्या संकल्प पूर्तीसाठी शिव, फुले,शाहू, आंबेडकर विचारधारेतील प्रामाणिक, ईमानदार, कार्यकर्त्यांच्या हाताला काम, पोटाला अन्न, मुलांना शिक्षण आणि कुटुंबाच्या आरोग्याचे रक्षण ही जबाबदारी घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात स्वाभिमानी सत्यशोधक पत्रकार,कार्यकर्त्यांची फौज निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. असे प्रतिपादन सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थापक/अध्यक्ष विशाल धेंडे यांनी केले. ते वाकी ता.बारामती येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलत होते.राष्ट्रपिता जोतीराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सव दिना निमित्त सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्था महा राज्य च्या वतीने 'सत्यशोधक कार्यकर्ता निर्माण अभियान अंतर्गत"सत्यशोधक संवाद सभेचे' आयोजन रविवार दि.२४ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते.सदर संवाद सभेमध्ये 'सत्यशोधक समाज स्थापनेचे ध्येय- उद्देश,सत्यशोधक चळवळीचा इतिहास,वर्तमान आणि भविष्यकालीन संकल्पना,उपक्रम' या विषयावर संवाद साधण्यात आला. यावेळी सरपंच किसन बोडरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक व उपसरपंच हनुमंत जगताप,पोलीस पाटील हनुमंत जगताप,तंटामुक्ती समिती अध्यक्ष संतोष जगताप,माजी सरपंच हनुमंत गाडेकर, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक महादेव गायकवाड,सजीव संरक्षण आणि जागृती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भालचंद्र महाडीक ,सेवानिवृत्त आर.टी.ओ.अधीकारी डॉ.मधुकर वाघमारे, लेझीम पथक संचालक धनू जगताप,पत्रकार सुशील गायकवाड,सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव राहुल गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शिवराम जगताप,दिलिप गायकवाड,बबन जाधव,सुभाष जगताप,वायरमन भुजंग गाडेकर,संस्थापक सदस्या प्रज्ञा गायकवाड, संस्थापक सदस्या रेखा धेंडे,सुरेश गायकवाड, अरविंद जगताप,दिलीप गाडे तसेच ग्रामस्थ, कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन स्वराज्याचा जाहीरनामाचे कार्यकारी संपादक सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुरेश गायकवाड,



सेवानिवृत्त मुख्याध्यापक अरविंद जगताप यांनी केले होते. तत्पूर्वी सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे पदाधिकारी आणि प्रमुख उपस्थितांचे स्वागत लेझीम पथकाच्या गजरात करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात बहुजन महापुरुषांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करुन तसेच दिप प्रज्वलीत करुन करण्यात आली. आयोजकांनी सर्व मान्यवरांचा सन्मान सत्यशोधक चळवळीची पुस्तके आणि गुलाब पुष्प देऊन केला. सेवानिवृत्त आर.टी.ओ.अधीकारी डॉ.मधुकर वाघमारे यांनी मनोगत व्यक्त करताना राष्ट्रपिता जोतिराव फुले यांना सत्यशोधक समाजाची स्थापना का करावी लागली याचे विश्लेषण केले. उपसरपंच हनुमंत जगताप यांनी राष्ट्रपिता जोतिराव फुले आणि सावित्रीमाई फुले यांनी सुरु केलेल्या पहिल्या शाळेचे महत्व, तत्कालीन परिस्थिती आणि सध्याची परिस्थिती हा महत्वपूर्ण विषय मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप गाडे यांनी तर प्रास्ताविक पुरोगामी लेखक,सेवानिवृत्त मुख्याध्यापक अरविंद जगताप यांनी केले.यावेळी वाकी ग्रामपंचायतीस भारतीय संविधान पुस्तक देण्यात आले.

# शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई द्या, पीक विमा कंपनीला तहसीलदारांचे आदेश



आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दांडी मारली होती तसेच खरीप हंगामातील पिकांची पाण्याची कमतरता असल्याने पिकांची वाढ खुंटली होती. यातच पिकांची अतोनात नुकसान होत होती. आता सध्या कुठे कोरडा दुष्काळ तर कुठे ओला दुष्काळ अशी परिस्थिती निर्माण झाल्याची दिसून येत आहे. यामध्ये फुलंब्रीचे तहसीलदार डॉक्टर कृष्णा कानगुले यांच्या अध्यक्षतेखाली काल सोमवारी दिनांक 25 सप्टेंबर रोजी बैठक झाली. यावेळी फुलंब्री तालुका कृषी अधिकारी भारत कासार चोला मंडलम पिक विमा औरंगाबाद जिल्हा प्रतिनिधी ईश्वर भिंगारे , फुलंब्री तालुका पिक विमा प्रतिनिधी बी. डी. अंभोरे, विशाल सोनवणे यांच्या सह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. सदर या बैठकीत फुलंब्री तालुक्यातील पिरबावडा महसूल मंडळातील शेतकऱ्यांना मध्य हंगाम प्रतिकूल परिस्थितीची 25% टक्के नुकसान झालेल्या पिकांची नुकसान भरपाई का देण्यात आली नाही? असा प्रश्न निर्माण केला. पिकांच्या नुकसानीची पुर्वसुचना दिल्यानंतर पिक विमा कंपनी प्रतिनिधींनी तात्काळ पंचनामे करून घ्यावे अशी मागणी केली. यावेळी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेत फुलंब्री चे तहसीलदार डॉक्टर कृष्णा कानगुले यांनी पिक विमा प्रतिनिधींना तात्काळ पंचनामे करून संबंधित शेतकऱ्यांना 25% टक्के आगाऊ रक्कम देण्यात यावी. तसेच सध्या पडत असलेल्या पावसामुळे शेतात पाणी तुंबत आहे. यामुळे खरीप हंगामातील पिकांची नुकसान होत आहे. यासाठी सर्व शेतकऱ्यांनी पिक विमा कंपनीकडे तक्रार करावी व तक्रार करताना ईनुनडेशन या पर्यायाची निवड करावी असे आवाहन तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी केले.



# राज्यातील शाळा बंद करण्यास विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** संभाजीनगर राज्यभरातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे एकत्रीकरण करुन समूह शाळा उभारण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाने काम सुरु केले असून याबाबतचे प्रस्ताव १५ ऑक्टोंबरपर्यंत सादर करण्याचे आदेश राज्याचे शिक्षण आयुक्त यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागात २० पटसंख्येपेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या १४७८३ शाळा बंद होण्याची भिती शिक्षण क्षेत्रातून होत आहे. यात छ. संभाजीनगर जिल्हयातील १२८ शाळा बंद होण्याची शक्यता आहे. वाड्या वस्त्यावरील विद्यार्थ्यापर्यंत शिक्षण पोहोचावे यासाठी सरकारने या शाळा सुरु केल्या होत्या. यातून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचा प्रयत्न होता. त्यामुळे शाळा बंद करण्याचा हा निर्णय ग्रामीण भागातील गरीब व वंचित विद्यार्थ्यांचे नुकसान करणारा आहे. सरकारचा हा निर्णय घाईचा आहे. आताची समूह शाळांची प्रक्रिया विरुद्धपद्धतीने राबवली जात असल्याचे सूर शिक्षण क्षेत्रातून उमटू लागले आहेत. या निर्णयाचा सर्वाधिक फटका जिल्हा परिषदेच्या शाळांवर होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. शाळा दूरवर होणार आहे. शाळा दूर झाल्यावर मुलाच्या शिक्षणावर परिणाम होईल. शाळा दूर झाल्याने विद्यार्थ्यांना प्रवास वाढणार आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवासाची जबाबदारी कोण घेणार, हा देखील प्रश्नच आहे. १२५ वर्षाच्या संघर्षानंतर मिळालेल्या शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली करणारे हे धोरण आहे. शाळा खाजगीकरण कंपनीकरण झाल्यास मनमानी पध्दतीने फिस आकारल्यामुळे शिक्षणाचा खर्च गोरगरीबांच्या आवाक्याबाहेर जाईल व गरीब पालक विद्यार्थ्यांना शिक्षण देवू शकणार नाही, तरी याबाबत योग्य ती उचित कारवाई करुन वरील घेतलेले निर्णय तात्काळ रद्द करावेत, या मागण्याचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांच्या गृह शाखे मार्फत मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांना दिले आहे. या निवेदनावर जिल्हा उपाध्यक्ष योगेश उबाळे, आकाश साबळे, संदीप अहिरे. यांच्या सह्या आहेत



# वेरूळ येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेकडून स्वच्छता दूतांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरूळ येथील केंद्रीय प्राथमिक शाळेत वेरूळ ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारी शेख नईम,राजेश आडे, गोरख लोणके, सूर्यभान भालेराव, अविनाश आव्हाड, व शालेय स्वच्छता कर्मचारी अलकाबाई कांबळे, ज्योतीबाई कांबळे, जिजाबाई भालेराव, यांचे स्वागत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने फुल देऊन स्वागत करण्यात आले. दिनांक १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर स्वच्छता पंधरवडा कार्यक्रम निमित्ताने स्वच्छता दुताचे सन्मान यावेळी करण्यात आले. खुलताबाद पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री कहाटे साहेब यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता पंधरवाडा यावर माहिती दिली. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री सतीश देवेंद्र लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांचे समाजातील योगदान यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका मगर यांनी केले. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती सदस्य श्रीकांत कारभारी भालेराव , शेख रियाज, ग्रामविकास अधिकारी स्वप्नील घडमोडे, मुख्याध्यापिका संगीता पांडे, सहशिक्षिका मनीषा उदावंत, , छाया माळी, संगीता देशमुख, अंजली कान्हेड, अर्चना चव्हाण, छाया सोनवणे, पल्लवी जयस्वाल यांच्यासह नागरिक, विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# विविध मागण्यांसाठी शिवसेनेचे रास्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**येवला :** परिसरात यंदाचा पावसाळा पूर्णपणे कोरडा गेल्याने राजापूर परिसरात संपूर्णपणे खरीप हंगाम वाया गेलेला आहे. सदर क्षेत्रात घेतले जाणारे प्रमुख पिकांपैकी मका, सोयाबीन, तूर, मुग व कपाशी आदी सर्व पिकांचे पाण्याअभावी नुकसान झाल्याने पिकांपासून मिळणारे उत्पन्न वाया गेलेले आहे. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आज दि.२५ सप्टेंबर रोजी येवला - नांदगाव रोडवर राजापूर येथे शिवसेनेचे जिल्हा अध्यक्ष कुणाल दराडे यांच्या नेतृत्व खाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

**मागण्या :** शेतकऱ्यांचे बँकांकडून होणारी कर्जवसुली थांबवावी, तसेच वीज बिलामार्फत होणारी वसुली, पिक कर्ज वसुली, सोसायटी व राष्ट्रीयकृत बँका यांचे कडून जबरदस्तीने होणारी कर्ज वसुली पूर्णपणे थांबविण्यात यावी. तसेच मागील हंगामातील शासनामार्फत जाहीर झालेले कांद्याचे अनुदान संपूर्ण मिळावे. तसेच बँकेने लावलेले होल्ड काढण्यात यावे. शासकीय अनुदान अडविण्यात येवु नये,संपूर्ण पिकविमा मंजूर करावा, जनावरांसाठी चारा छावण्या उपलब्ध करून द्यावा, राष्ट्रियकृत बँकानी शेतक-यांना पिक कर्ज देताना सिबील स्कोअरची अट रद्द करावी. देण्यात याव्या. बेरोजगार सुशिक्षित तरुण व शेत मजुरांसाठी रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच शासकीय मदत जाहीर करावी. येवला तालुक्यातील पूर्व भाग यात राजापूर मंडळ / राजापूर गट यामध्ये सुमारे ३० ते ४० गावे असून सदर गावांमध्ये जलसिंचनाचे साधन उपलब्ध नसल्याने शेती व्यवसाय हा पूर्णतः पावसाचे पाण्यावर अवलंबून आहे.सदर भागामध्ये कायमस्वरूपी जल सिंचनाचा स्रोत उपलब्ध करून देण्यात यावा, येवला तालुका दुष्काळ जाहीर करून मिळावा, शासनामार्फत मदत जाहिर करण्यात यावी.



## महात्मा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे मोफत टॅब वाटप



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सहाय्यक आयुक्त समाज कल्याण धुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे विद्यार्थ्यांना मोफत टॅब वितरित करण्यात आले.

इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती महाराष्ट्र राज्य नागपूर या संस्थेमार्फत JEE/NEET/MHT-CET-2025 चे पूर्व प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्तम अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रमात विकास होण्यासाठी नोंदणी करून आधुनिक अभ्यासक्रमाचा आढावा लक्षात घेता संस्थेकडून मोफत सॅमसंग कंपनीचे टॅबलेट वितरित करण्यात आले या ठिकाणी उपस्थित अधिकारी मुकेश कानडे यांच्या हस्ते तब्बल ५०० ते ६०० टॅब विद्यार्थ्यांना देण्यात आले. या ठिकाणी उपस्थित सर्व ग्रामीण भागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

## 200 मोबाइलची चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मोबाइल विक्री करणाऱ्या दुकानाचा दरवाजा उचकटून चोरट्यांनी ५३ लाख रुपयांचे २०० मोबाइल संच चोरून नेल्याची घटना कोथरुडमधील डहाणूकर कॉलनी परिसरात घडली. याबाबत गौरव शिंदे (वय ३१, रा. वारजे) यांनी कोथरुड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गौरव यांचे डहाणूकर कॉलनीत मोबाइल विक्री दुकान आहे. चोरट्यांनी मोबाइल विक्री दुकानाचा दरवाजा मध्यरात्री उचकटून २०० मोबाइल संच चोरून नेले. चोरीला गेलेल्या मोबाइलची किंमत ५३ लाख रुपये असल्याचे शिंदे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.

## प्रशांत डिक्कर यांच्या उपस्थितीत पातुर्डा येथे प्रवेश सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**संग्रामपूर :** शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नावर आक्रमकपणे राज्यभर लढणाऱ्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्याला युवकांची पंसती वाढत आहे. या कष्टकरी जनतेच्या न्याय हक्कासाठी उभा केलेल्या लढ्यात सहभागी होत पातुर्डा येथिल बहुसंख्य युवकांनी प्रशांत डिक्कर यांच्या उपस्थित संघटनेत प्रवेश घेतला. यावेळी सलाम कुरेशी, शेख अनिस ,शेख सुलेमान , असलम शहा, करीम शहा, अहमद कुरेशी, युसुफ कुरेशी, अजहर शहा, शोएब शहा, जुबेर शहा , अजहर जमदार, तनवीर जमदार, रवीपुरण बोपले, आशिष उंबरकर , वसिम शहा, अंकुश वानखडे, राज राऊत , अभिमन्यू येरुकार, सुरेन्द्र वानखडे, राजेश सुरळकार, गणेश भड, शोएब पठाण,यांच्या सह अनेक युवकांनी बिल्ला लाऊन संघटनेत आपला प्रवेश निश्चित केला. पातुर्डा येथिल



ग्राम सेवा सहकारी सोसायटीमधे छोटेखानी आयोजित केलेल्या प्रवेश सोहळा बैठकीत प्रशांत डिक्कर यांनी युवकांना मार्गदर्शन केले. कष्टकरी माय बाप जणतेसाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे लढण्यासाठी वज्रमूठ करा. आणि आपल्या आई बापाचा घाम पायाखाली तुडवणारे राज्यकर्त्यांना त्यांची जागा दाखवा असे आव्हान यावेळी प्रशांत डिक्कर यांनी बैठकीत बोलतांना केले. जळगाव,संग्रामपूर तालुक्यात २२ जुलैच्या अतिवृष्टीच्या महापुराने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरकार तुटपुंजी मदत देत पाहु आहे. खरडुन गेलेल्या जमीनीमधे ४ ते ५ वर्ष उत्पन्न येत नाही. त्यामुळे या शेतीवर घेतलेले पिक कर्जाचा भरणा कसा करावा. याकरीता खरडुन गेलेल्या जमीनीवरील सरकारने हे कर्ज माफ करावे, पुरामधे घरे वाहुन गेलेल्यांसाठी जागेच्या ८ (अ) ची अट न लावता. रहिवासी असल्याची खात्री करून त्यांना घर बांधणीसाठी निधी द्यावा. व सानुग्रह अनुदान वाटपात जाणिवपूर्वक मदतीपासून वंचित असलेल्या पुरग्रस्तांना शासकीय मदत द्यावी. या पुरग्रस्तांच्या महत्त्वाच्या मागण्या आहेत. परंतु सत्ताधारी या पुरग्रस्तांच्या नुकसानीला महत्तव देत नसुन केवळ संरक्षण भिंती,रोड, बंधारे दुरुस्तीसाठी शासनाचा निधी मागवुन कमीशनचा धंदा करण्याकडे पंसती देत असल्याचे निदर्शनास येत आहे. याकडे आपणच स्वतः गांभिर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रशांत डिक्कर यांनी बोलतांना सांगितले. यावेळी संघटनेचे यावेळी, दाऊद शहा, संतोष गाळकर, बाबुराव येरूकार, सुनिल तायडे, दत्ता डिक्कर, सह उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर